


रविवार, १ जानेवारी २०२३

◆ वर्ष १५ ◆ अंक १६४
www.ramprahar.com

# रामप्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

नागपूरचे संघ मुख्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी/२
गेल कंपनीतर्फे अलिबागच्या उसरमध्ये नवा प्रकल्प/५
बीसीसीआयची आज मुंबईत आढावा बैठक/८

# रायगडात नववर्षाचे धूमधडाक्यात स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**



(छाया : सुधीर नाझरे)

कोरोनाच्या भीतीने २०२१ आणि २०२२चे स्वागत मनासारखे करता आले नाही, पण २०२२ला निरोप देण्यासाठी आणि २०२३चे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्ह्यात समुद्रकिनारी तसेच इतर पर्यटनस्थळी जी गर्दी उसळली होती ती लक्ष वेधून घेणारी होती. रायगडवासीयांसोबत मुंबई, पुणे आणि अन्य जिल्ह्यांतून आलेल्या पर्यटकांनी सरत्या वर्षाला निरोप देत धूमधडाक्यात नववर्षाचे स्वागत केले.

येणारे प्रत्येक नवीन वर्ष सरताना सोबत गोड आणि कटू आठवणी ठेवून जाते. कोरोनाच्या महामारीत दोन वर्षे सरली. त्यामुळे नवीन वर्षाच्या स्वागताला कोणतीच कसर मागे ठेवायची नाही हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून २०२२ वर्षाला आनंदात निरोप देण्यासाठी लोक घराबाहेर पडले. दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून काही क्षण आनंदात घालविण्यासाठी आपल्या आवडत्या पर्यटनस्थळांना पसंती देताना मुंबई-पुण्यातील पर्यटकांनी नेहमीप्रमाणे अलिबाग, मुरूड तालुक्याची निवड केली. दिवाळीच्या सुटीतच ३१ डिसेंबरचे बुकिंग करण्यात आले होते.

नाताळ सुटीच्या निमित्ताने रायगडात दाखल आलेल्या पर्यटकांनी ३१ डिसेंबरपर्यंत मुक्काम ठोकला. जिल्ह्यात विशेषतः समुद्रकिनारी असलेल्या तालुक्यांतील खाद्यपदार्थांची गोडी सर्वच पर्यटकांना लागून राहिली आहे. स्वच्छ हवा, सुंदर आणि प्रशस्त समुद्रकिनारे, राहण्याची आणि खाण्याची सर्वोत्तम सोय याचीही त्यांना भुरळ पडली.

### हॉटेल, रिसॉर्ट, कॉटेजमध्ये रंगली 'थर्टीफर्स्ट'ची पार्टी

अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, सुधागड, पेणसह अन्य तालुक्यांतील नामांकित रिसॉर्ट, हॉटेल आणि कॉटेजमध्ये ३१ डिसेंबरच्या पार्टीचे विशेष आयोजन करण्यात आले होते. यात खाद्य मेजवानी तर होतीच शिवाय संगीत कार्यक्रमांना विशेष मागणी होती. संगीताच्या तालावर नाचण्याचा, गाण्याचा पर्यटकांनी आनंद लुटला. दरम्यान, आनंदाला कुठेही गालबोट लागू नये म्हणून पोलीस प्रशासन सतर्क होते. सर्वत्र पोलिसांची करडी नजर होती.

(छाया : विकास म्हात्रे)



# नेरे ग्रामपंचायतीच्या सदस्य कल्पना वाघे भाजपमध्ये

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील १० ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच झाली. यामध्ये नेरे ग्रामपंचायतीच्या सदस्यपदी सामाजिक कार्यकर्त्या कल्पना अशोक वाघे यांची बिनविरोध निवड झाली होती. त्यांनी आपल्या समर्थकांसह शनिवारी (दि. ३१) भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत विकासाचे 'कमळ' हाती घेतले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, माजी सदस्य गोटीराम पाटील, निलेश पाटील, गोपीनाथ पाटील, गोपाळ रोडपालकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, मिलिंद पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर..)

# नववर्षानिमित्त आज रामबागमध्ये लाईव्ह म्युझिकल इव्हेंट रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुबईच्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे उभारण्यात आलेल्या माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब उद्यान अर्थात रामबागमध्ये नवीन वर्षनिमित्त लाईव्ह म्युझिकल इव्हेंट या सुरेल गाण्यांची मैफिल असलेल्या संगीतमय कार्यक्रमाचे रविवारी (दि. १ जानेवारी २०२३) सायंकाळी ६.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी स्वर्गसुख आनंद देणारी रामबाग साकारली आहे. १४ एकर जागेतील या रामबाग उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे अशा सर्व बाबी आकर्षक व मनमोहक पद्धतीने आहेत. सायंकाळी या उद्यानाचे रूप बदलते. त्या वेळी तेथील विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्यांचे पारणे फेडणारी असते आणि हा संगीतमय कार्यक्रम सायंकाळी असल्याने त्याचा रसिकांना मनमुराद आनंद घेता येणार आहे. कार्यक्रम निशुल्क असून अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३) किंवा गणेश जगताप (९८७०११६९६४) यांच्याशी संपर्क साधावा.

# खारघरमध्ये एक कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

## १६ नायजेरियन नागरिक ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला क्राईम ब्रँचकडून खारघर परिसरात मोठी कारवाई करण्यात आली आहे. खारघरमधील एका बंगल्यातून १६ नायजेरिय नागरिकांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून एक कोटी रुपयांचे ड्रग्स हस्तगत करण्यात आले आहे.

खारघर से. १२मधील एका बंगल्यात गांजा पार्टी सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखा पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी या बंगल्यात धाड टाकून सहा महिला आणि १० पुरुष असे एकूण १६ नायजेरियन नागरिकांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून पोलिसांनी एक कोटींचे ड्रग्ज हस्तगत केले आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे. (पान २ वर..)

# आमदार महेश बालदी यांनी अधिवेशनात मांडली उरणच्या मच्छीमारांची व्यथा


**नागपूर : प्रतिनिधी**




उरण तालुक्यातील मच्छीमार १२ नॉटिकल माईल्सच्या बाहेर मासेमारी करीत असून ते केवळ मार्केटिंग करण्याकरिता मुंबईतील भाऊच्या धक्क्यावर येत असताना फिशरीज विभाग त्यांना दंड करीत आहे. याकडे उरणचे आमदार महेश बालदी यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले. त्यावर मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शासन याचा नक्की विचार करेल, असे आश्वासित केले.

उरणच्या मच्छीमारांची व्यथा सभागृहात मांडताना आमदार महेश बालदी म्हणाले की, माझ्या इथला उरण तालुक्यातील मच्छीमार १२ नॉटिकल माईल्सच्या बाहेर मासेमारी केल्यानंतर फक्त मार्केटिंग करण्याकरिता मुंबईतील भाऊच्या धक्क्यावर येत असताना फिशरीज विभाग त्यांना दंड करते. त्यांना शिक्षा करते. त्यांना दोन लाख, पाच लाख, सात लाख असा भूर्दंड पडतो. मग त्या गरीब मच्छीमारांनी जगावे की मरावे हा प्रश्न आहे. हे मच्छीमार फिशरीज विभागाच्या हद्दीत मासेमारी करीत नाही आणि या मच्छीमारांनी बोटीमध्ये जीपीएस लावले आहे. त्यामुळे त्यांनी मासेमारी १२ नॉटिकल माईल्सच्या बाहेर केलीय की आत हे लक्षात येते. एवढा खर्च करायला शासनाने त्यांना लावले. त्यांनी जीपीएस, अत्याधुनिक तंत्रज्ञान बसविले, पण त्यांना लँडिग करतानाही परवानगी देत नाही हे कसे काय होईल. याबाबत मच्छीमारांना न्याय द्यावा. (पान २ वर..)





(छाया : लक्ष्मण ठाकूर)


### नागरिकांनी रामबाग फुलली

**सरत्या वर्षाचा शनिवारी (दि. ३१) शेवटचा दिवस होता. त्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास येत असलेल्या रामबागमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. एवढे भव्य व आकर्षक उद्यान उभारल्याबद्दल नागरिकांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.**









# नागपूरचे संघ मुख्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी

**नागपूर : प्रतिनिधी**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात बॉम्बस्फोट घडवण्याच्या धमकीचा दूरध्वनी एका अज्ञात व्यक्तीने पोलीस नियंत्रण कक्षाला केला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संघ मुख्यालयाची सुरक्षा व्यवस्था वाढवली. धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या महिन्यातसुद्धा सचिन कुलकर्णी नावाच्या महापारेषणच्या अभियंत्याने संघ मुख्यालयाला बॉम्बने उडविण्याची धमकी दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवारी (दि. ३१) सकाळी ११च्या सुमारास पोलीस नियंत्रण कक्षाला निनावी दूरध्वनी आला. दूरध्वनी करणाऱ्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयात बॉम्बस्फोट घडविणार असल्याची धमकी दिली. नियंत्रण कक्षाने लगेच पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठांना माहिती दिली. क्युआरटी कमांडोसह पोलिसांच्या तुकड्या संघ मुख्यालयात पाठविण्यात आल्या. पोलीस उपायुक्त गोरख भामरे यांनी लगेच संघ मुख्यालय गाठले आणि सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. संघ मुख्यालयाला उडविण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध पोलीस घेत आहेत.

सायबर क्राईमच्या माध्यमातून निनावी फोन करणाऱ्याचे शोध घेणे सुरू आहे. गेल्या महिन्यातच सचिन कुलकर्णी नावाच्या इसमाने संघ मुख्यालय उडविण्याची धमकी दिली होती. त्याला सक्करदरा पोलिसांनी अटक केली होती. या वेळीसुद्धा पोलिसांना अशाच प्रकारचा संशय आहे. त्यामुळे सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी पोलीस विभागात खळबळ उडविण्यासाठीच कुणीतरी धमकी दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, संघ मुख्यालय उडवण्याची धमकीचा फोन पोलीस नियंत्रण कक्षाला आला होता. त्यामुळे पोलिसांनी मुख्यालयाची सुरक्षा वाढविली आहे. सायबर क्राईमच्या पथकाद्वारे फोन करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेणे सुरू आहे. त्याला लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती झोन ३चे पोलीस उपायुक्त गोरख भामरे यांनी दिली.

### पोलिसांनी सुरक्षा वाढवली

**संपूर्ण देश सरत्या वर्षाला निरोप देत असताना आणि नववर्षाच्या स्वागतासाठी तयारी करत असताना नागपूर पोलिसांची चिंता वाढवणारी बाब समोर आली आहे. दुपारी १च्या सुमारास नागपूर पोलिसांना राष्ट्रीय स्वंयसेवक संघ मुख्यालय उडवून देण्याची धमकी देणारा निनावी फोन आला. त्या फोन कॉलमध्ये संघ मुख्यालय उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याने पोलीस सतर्क झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे. नागपूर पोलिसांनी संघ मुख्यालयाची सुरक्षा वाढवली आहे. निनावी फोन आल्यानंतर पोलिसांनी संघ मुख्यालय उडवून देण्याची धमकी नेमकी कुणी दिली याची चौकशी सुरू केली आहे.**

## नवी मुंबई पोलिसांचा घरमालकांना दिलासा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तपदाची सुत्रे हातात घेताच नवनियुक्त आयुक्त मिलिंद भारंबे यांनी आपल्या कामाला सुरुवात केली आहे.

नवी मुंबई पोलीस मुख्यालय तसेच पोलीस ठाणे स्तरावर सुरू असलेल्या अवैध धंद्याला चाप बसवण्यासाठी नवीन पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेले आहेत तसेच सदनिका भाड्याने देणाऱ्यांसाठीही पोलीस आयुक्त भारंबे यांनी महत्त्वाची घोषणा केली आहे.

नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या हद्दीत आता सदनिका भाड्याने देताना पोलिसांची ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक नसणार आहे, मात्र घरमालकाने भाडेकरूबरोबर केलेला करार आणि त्याची माहिती स्थानिक पोलीसांना फक्त सादर करण्यासाठी कोणतेही पैसे द्यावे लागणार नाहीत.

त्याचप्रमाणे नंबरप्लेट बनवणारे, सायबरकॅफे चालवणारे, सिमकार्ड विक्रेते यांनी देखील ग्राहकांची माहिती घ्यावी अशा सूचना पोलिसांकडून करण्यात आल्या आहेत. पोलीस उपयुक्त प्रशांत मोहिते यांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली आहे. तसेच पासपोर्ट पडताळणी, चारित्र्य पडताळणी सारख्या इतर सुविधांसाठी दीड महिना कालावधी लागत असल्याचे पुढे आल्यानंतर आता महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सात ते १५ दिवसांत या सुविधा मिळणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## अल्पवयीन मुलाला कामोठे पोलिसांनी अवघ्या २४ तासांमध्ये काढले शोधून

**पनवेल : वार्ताहर**



कामोठे सेक्टर ११मधून हरवलेल्या अल्पवयीन मुलाला कामोठे पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शोधून त्याच्या कुटूंबाकडे सुपूर्द केल्याची कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

कामोठे सेक्टर ३६ येथील शिवसंकल्प को-ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये राहणाऱ्या पियुष संतोष जाधव (वय १५) हा नेहमीप्रमाणे आपल्या शाळेतून तो घरी आला. त्यानंतर तो कामोठे सेक्टर ११ मधील एका खाजगी क्लासला गेला, मात्र क्लास सुटल्यानंतर तो घरी आलाच नाही. त्यामुळे घाबरलेल्या पियुषच्या पालकांनी कामोठे पोलीस ठाणे गाठून मुलगा हरवल्याची तक्रार दिली. कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप पारखे यांच्या पोलीस पथकांनी पियुषचा शोध घेण्यास सुरुवात केली. सीसीटीव्हीच्या माध्यमातून शोध घेत असताना पोलिसांना पियुष हा मानसरोवर रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालताना दिसून आला, मात्र पुढे पियुष गेला कुठे हे पोलिसांना माहिती मिळणे कठीण झाले होते. त्यानंतर कामोठे पोलिसांनी रेल्वे पोलिसाच्या मदतीने पियुषचा शोध सुरू केला असता तो सीएसटी स्टेशनच्या बाहेर गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ही माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलीस सीएसटी स्टेशनच्या दिशेने रवाना झाले आणि पियुषचा शोध सुरू केला. शोधादरम्यान पियुष हा रेल्वे स्टेशनला बसल्याचे पोलिसांना दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्या आई-वडिलांकडे सुपूर्द केला. आपला मुलगा सुखरूप मिळाल्याने मिळाल्याचे पाहून जाधव कुटुंबाने कामोठे पोलिसांचे आभार व्यक्त केले.

## गव्हाण विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी व गणित विषयांचे शैक्षणिक साहित्य तयार करून हे दोन्ही कठीण वाटणारे विषय अध्ययन सुलभ केले.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शनही विद्यालयाच्या प्रयोगशाळेत भरवण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याची माहिती प्रदर्शनाला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना दिली. इयत्ता आठवी ब मधील विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली. या वर्गाच्या वर्ग शिक्षिका आणि इंग्रजी व मराठी भाषेच्या अध्यापिका विद्यालयातील उपक्रमशील शिक्षिका द्रोपदी वर्तक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या 'स्पोकन इंग्लिश' या प्रकल्पातील सहभागी विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेतून माहिती सांगितली.इंग्रजी व गणित या दोन्ही कठीण वाटणाऱ्या विषयांच्या संदर्भात अध्ययन-अध्यापन पद्धती अधिक सुलभ व्हावी आणि हे विषय विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ व्हावेत या हेतूने तयार करण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाला विद्यालयाच्या प्राचार्यांसह, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते तसेच इंग्रजी भाषेचे अध्यापक सागर रंधवे व देवेंद्र म्हात्रे तसेच मराठी भाषेचे शिक्षक प्रसन्न ठाकूर यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली. उत्कृष्ट शैक्षणिक साहित्य तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.



**पनवेल : भाताण ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच तानाजी पाटील यांना वाढदिवसानिमित भाजप कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**

## पनवेलमध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिशियन आणि टेलरिंगचे मोफत प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिशियन, टेलरिंगचे मोफत प्रशिक्षणाचे आयोजन अनुसूचित जातीच्या महिला युवती व युवकांसाठी करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी काही आवश्यक पात्रता आहेत. त्या पुढीलप्रमाणे प्रशिक्षण फक्त बौध्द, नवबौध्द, महार, होल्लार, बुरुड, वाल्मिकी, खाटीक इत्यादी अनुसूचित जातीच्या महिला, युवती व युवकांकरिता आहे. १८ ते ४० वयोगटातील महिला, युवती, युवक असून कमीत कमी ७ वी पास शिक्षण असावे. रायगड जिल्ह्यातील रहिवासी असावी. प्रशिक्षण कालावधी तीन महिने रोज दोन तास आहे. प्रशिक्षणानंतर शासनमान्य प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना रुपये ३,००० रुपये विद्यावेतन देण्यात येईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वतः चा व्यवसाय सुरू करण्यासाठी रुपये पाच लाखापर्यंत शासनाचे सबसिडी कर्ज देण्यात येईल. प्रवेशासाठी कागदपत्रे शाळा सोडल्याचा दाखला, अनुसूचित जातीचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, उत्पन्नाचा दाखला, शाळेचा दाखला, लग्न झाले असल्यास मॅरेज सर्टिफिकेट किंवा गॅझेट,रेशनकार्ड, मार्कशीट,बँक पासबुक, दोन फोटो इत्यादीचे दोन प्रतीत झेरॉक्स व प्रवेशासाठी ३ जानेवारी २०२३पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत वरिल ओरिजिनल व दोन प्रतीत झेरॉक्स कागदपत्रे घेऊन उपस्थित रहावे.

अधिक माहितीसाठी संपर्क किशोर देवधेकर (८३६९१००९२८ /८६९१८८६३३९) दृष्टी फाऊंडेशन. ठिकाण-एस. जी.डी. पब्लिक स्कूल, प्लॉट नं २८, सेक्टर-१०, खांदा कॉलनी पनवेल.

## करावे महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

करावे गाव येथील ज्ञानदीप सेवा मंडळाचे प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयाचा वर्धापन दिन सोहळा आणि वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात शुक्रवारी (दि. ३०) झाले. या वेळी आम्ही केलेलया खडतर प्रयत्नाची फलश्रुती झाली असल्याचे प्रतिपादन ज्ञानदीप हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय अध्यक्ष रवींद्र नाईक यांनी केले.या वेळी १७वर्ष वयोगट आंतरशालेय कबड्डी स्पर्धेत प्रथम, राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत तिसरा आलेला विकास जाधव तसेच अंधश्रद्धा निर्मूलन, नृत्य आदी शालेय स्पर्धात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच आदर्श शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक, उपाध्यक्ष विजय तांडेल, सचिव अरविंद नाईक, सहसचिव प्रसाद तांडेल, प्राचार्य पी. पी. पाटील, प्राचार्य रत्नाकर तांडेल (इंग्रजी माध्यम), प्राचार्य बंकट तांडेल (प्राथमिक) आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

### नेरे ग्रामपंचायतीच्या सदस्य कल्पना वाघे भाजपमध्ये

या वेळी ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक कार्यकर्त्या कल्पना वाघे यांच्यासह सुरेश वाघे, दशरथ वाघे, बाळू वाघे, गोपाळ वाघे, संतोष वाघे, पोशा वाघे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

### खारघरमध्ये एक कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

गेल्या काही महिन्यांपासून खारघर शहरात नायजेरियन, युगांडा, नांबिया देशातील नागरिक मोठ्या संख्येने अनधिकृतपणे राहत आहेत. याकडे भाजपच्या वतीने लक्ष वेधत सरचिटणीस दीपक शिंदे यांनी शिष्टमंडळासह स्थानिक पोलीस ठाण्याला २६ मे २०२२ रोजी निवेदन दिले होते. अशा अनधिकृत राहणाऱ्या नागरिकांची नोंद पोलीस ठाण्यात आहे का? शिवाय अमली पदार्थ विक्रीमध्ये नायजेरियन व्यक्तींचा सहभाग असल्याचे यापूर्वी आढळून आले असल्याने स्थानिक तरुण जीवघेण्या नशेच्या आहारी जाणार नाहीत ना याची काळजी घ्यायला हवी, अशीही चिंता त्यांनी व्यक्त केली होती.

### आमदार महेश बालदी यांनी अधिवेशनात मांडली उरणच्या मच्छीमारांची व्यथा

यावर उत्तर देताना मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, या बोटींसंदर्भात विधानसभा अध्यक्षांनी ४ ऑगस्टला बैठक घेतली आणि आपण केंद्राकडे पत्रही पाठविण्यास सांगितले. याबाबत विविध राज्यांमध्ये दुमत आहे. १२ नॉटिकल माईल्सच्या पुढे राज्याचा अधिकार नाही, परंतु आता अशी कोणतीही यंत्रणा नाही. मग इथं पारंपरिक मासेमारी करणारे आणि पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करणाऱ्यांमध्ये द्वंद आहे. या द्वंदाचे शास्त्रशुद्ध उत्तर काढावे यासाठी २ ऑगस्ट २०२२ रोजी डायरेक्टर सीएमएफआरआय यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती नेमली आहे. या समितीच्या माध्यमातून शिफारशी अहवाल आल्यानंतर देशभर एकच पॉलिसी होईल. आता या क्षणाला काही ठिकाणी बंदी आहे, काही ठिकाणी केली जात आहे. जैवविविधता नष्ट होईल अशी शंका व्यक्त केली जात आहे, पण सन्माननीय आमदार महेश बालदी हे अतिशय अभ्यासू सदस्य आहेत आणि म्हणून त्यांच्या अभ्यासाचा विचार करून त्यांच्या मार्गदर्शनाचाही शासनाला बैठकीत उपयोग करता येईल. हा विभाग त्याचा नक्की विचार करेल.

## फुंडे हायस्कूलमध्ये पालक जनजागृती अभियान

**उरण : रामप्रहर वृत्त**

तुकाराम हरी उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे शुक्रवार (दि. ३०) डिसेंबर रोजी पालक मेळाव्यानिमित्त सर्व पालक बंधू-भगिनींना मार्गदर्शनपर व्याख्यान आणि माता पालक व पालक शिक्षक संघाच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप असा दुहेरी कार्यक्रम झाला.

ज्येष्ठ साहित्यिक, लेखक, कवी, महाराष्ट्र राज्य आगरी कोकण साहित्य परिषदेचे सचिव, रायगड भूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी लिंग समभाव आणि लेक वाचवा अभियान या विषावर सर्व पालक बंधू-भगिनींचे व्याख्यान, कविता, विनोदाच्या माध्यमातून उद्बोधन केले. तर आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त, लेखक, कवी आणि खऱ्या अर्थाने व्यसनमुक्त समाजासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे श्री मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी तंबाखू आणि त्याचे दुष्परिणाम याबतीत पालक बंधू-भगिनींची जनजागृती केली, तर आयुर्वेदाचार्य मनिषा मोरे यांनी स्वस्थ, सुदृढ शरीरासाठी आयुर्वेदाचे महत्व आणि विशेषकरून स्त्रियांमधील मासिक आजार याविषयी अधिक माहिती सांगून मार्गदर्शन केले.

## कर्नाळा अभयारण्यात दुर्मिळ चेस्टनट विंग्ड कुक्कू पक्ष्याचे दर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा पक्षी अभयारण्यात पहिल्यांदाचे दुर्मिळ अशा 'चेस्टनट विंग्ड कुक्कू' या पक्ष्याचे दर्शन झाले आहे. पक्षी निरीक्षकांना अभयारण्याच्या परिसरात हा पक्षी आढळून आला. कोकिळेच्या या दुर्मीळ प्रजातीच्या पक्ष्याचे दर्शन होण्याची ही महाराष्ट्रातील तिसरीच नोंद असून कर्नाळ्यात हा पक्षी प्रथमच नोंदवण्यात आला आहे. कर्नाळा पक्षी अभयारण्यात हिवाळी हंगामात मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत पक्षी येत असतात. यामध्ये दुर्मिळ पक्ष्यांचादेखील समावेश असतो. पक्षी निरीक्षक प्रशांत श्रीवास्तव गुरुवारी सकाळी कर्नाळा अभयारण्यात पक्षी निरीक्षणासाठी गेले होते. अभयारण्यातील एका तलावाच्या नजीक सकाळी एका काळ्या पक्ष्याची हालचाल त्यांना आढळून आली. त्या पक्ष्याचे फोटो काढून त्याचे निरीक्षण केले असता तो 'चेस्टनट विंग्ड कुक्कू' असल्याची माहिती श्रीवास्तव यांना समजली, तर कर्नाळ्यात या पक्ष्याचे प्रथमच दर्शन झाल्याची माहिती स्थानिक पक्षी निरीक्षक सागर म्हात्रे यांनी दिली. 'चेस्टनट विंग्ड कुक्कू' हा प्रामुख्याने आग्नेय आशिया आणि हिमालयाच्या पायथ्याच्या प्रदेशात आढळून येतो. या प्रदेशात हा पक्षी आपली विण करत असल्याची माहिती पक्षी अभ्यासक आदेश शिवकर यांनी दिली. श्रीलंकेमध्ये त्याचे हिवाळी स्थलांतर होते. हे स्थलांतर तो प्रामुख्याने पूर्व घाटाच्या प्रदेशामधून करतो. त्यामुळे त्याचे दर्शन दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ या राज्यांमध्ये होत असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात या पक्ष्याची ही नोंद राज्यातील तिसरीच नोंद असल्याचे त्यांनी नमूद केले. हा पक्षी भरकटलेल्या अवस्थेत कर्नाळ्यात आल्याचा अंदाज सागर म्हात्रे यांनी व्यक्त केला.

### दुखवटा

## अंकीत मुकादम



**पनवेल** : तालुक्यातील शिरढोण पाडा येथील अंकीत विकास मुकादम (वय १७) याचे नुकतेच (दि. २९ डिसेंबर) अकस्मात निधन झाले. अंकीत हा पनवेलमधील सीकेटी महाविद्यालयात अकरावी इयत्तेत शिक्षण घेत होता. शिस्तप्रिय, हुशार, शांत, हजरजबाबी असलेला अंकीत कमी वयात गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे. त्याच्या पश्चात आई, वडील, बहीण, आजोबा असा परिवार आहे. अंकितचा दशक्रिया विधी ७ जानेवारी रोजी श्रीक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे, तर उत्तरकार्य ८ जानेवारी रोजी शिरढोण पाडा येथे होणार आहे.

# नवीन पनवेलमध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले

## पोलीस गस्त वाढविण्याची मागणी / चारुशीला घरत यांचे निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल परिरात चोऱ्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून येथील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे नवीन पनवेल क्षेत्रातील विविध परिसरामध्ये वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर गस्त वाढवविण्यात यावी, अशी मागणी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत व भाजप शिष्टमंडळाने केली आहे. या संदर्भात त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात उपायुक्त आणि वरिष्ठ निरीक्षकांना निवेदन दिले आहे.



पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल, सेक्टर १५, सेक्टर १६, व पोदी या परिसरामध्ये मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटना होत असल्याबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या असून यामुळे नागरिक घाबरलेले आहेत. त्यामुळे विशेषत्वाने सेक्टर १५, सेक्टर १६, व पोदी या भागामध्ये रात्रीच्या वेळी पोलीस विभागाच्या माध्यमातून गस्त वाढवण्यात यावी व अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याकरिता कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. पनवेल महापालिका हद्दीतील नवीन पनवेल, सेक्टर १५, सेक्टर १६, व पोदी या परिसरामध्ये गस्त वाढवून या परिसरातील आबालवृध्दांना दिलासा देण्यात यावा, असे चारुशीला घरत यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

खांदेश्वर पोलीस ठाण्यात उपायुक्त तसेच वरिष्ठ निरीक्षक कोकाट यांना निवेदन देतेवेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्यासह भाजप महिला मोर्चा जिल्हा सदस्य सरोज मोरे, सदस्य वैशाली पाटील, सुजाता पाटील, सोनाली कुडाले, सुजाता महाडिक आदी उपस्थित होत्या.

## निवडक

### वाहनाची ठोकर लागून एकाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल जवळील पळस्पे ते जेएनपीटीकडे जाणाऱ्या स्पीड ब्रेकर हॉटेलसमोरील लेनवर अज्ञात वाहनाची ठोकर लागून एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे असून त्याची उंची ५.७ फुट, उभट चेहरा, रंगाने सावळा, डोक्यास वाढलेले केस, दाढी मिशा काळी पांढरी, अंगात काळा रंगाचा त्याचावर पांढरे ठिपके असलेला शर्ट, पांढरी मळकट लुंगी असा पेहराव घातलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४६२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कंपनीच्या डिझेलची परस्पर विक्री

**पनवेल :** कंपनीच्या सुपरवायझरने रोडरोलरमध्ये भरण्यासाठी दिलेले ४०३ लिटर डिझेलची परस्पर विक्री केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये रोड रोलरवर ड्रायव्हर म्हणून करणाऱ्या चिंचपाडा येथील आरोपी रशिद अन्सारी व नौशाद अन्सारी यांना कंपनीचे सुपरवायझर यांनी रोडरोलरमध्ये भरण्यासाठी दिलेले ३७ हजार रुपये किमतीचे ४०३ लिटर डिझेलची परस्पर विक्री केली. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खांदेश्वर मंदिर परिसरात अश्लील कृत्य करणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदेश्वर मंदिराच्या परिसरात आणि हार्बर रेल्वे लाईनवरील ब्रिजच्याखाली अनेक तरुण-तरुणी अश्लील चाळे करीत असतात. या कृत्याचा येथून प्रवास करणाऱ्या नागरिकांना त्रास होत असून त्यांनी या संदर्भातील तक्रारी आझाद ज्येष्ठ नागरिक संघाकडे केल्या होत्या. अशांवर कारवाई करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन या संघाने खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्री. कोकाटे यांना दिले आहे.

अश्लील चाळे करणाऱ्या युवकांवर युवतींवर त्वरित कारवाई करावी व त्यांना चांगली अद्दल घडवावी, असे निवेदनात म्हटले आहे. या संदर्भात खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कोकाटे यांनी आश्वासन दिले की, यापुढे असे काही टोळके बसले असल्यास त्वरित पोलीस ठाण्यात संपर्क करावा. आम्ही त्यांच्यावर योग्य ती कारवाई करू.

निवेदन देतेवेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव कृष्णा पाटील व कार्याध्यक्ष विलास काळे, सदस्य प्रकाश साळुंखे, सदस्य आप्पासाहेब बजबळे व खांदा कॉलनी भाजप सरचिटणीस भीमराव पोवार उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींच्या आई हिराबेन यांना श्रद्धांजली



**खारघर : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन यांच्या निधनामुळे संपूर्ण देशात शोककळा पसरली. भार्गवी शंकर चॅरिटेबल ट्रस्ट व शिवाश्रम निराधार महिला वृद्धाश्रमाचे संस्थापक मधू आचारी यांच्या आश्रमात भाजप मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्या उपस्थितीत भाजप पदाधिकारी व सदस्यांनी कै. हिराबेन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व १०८ दीप प्रज्वलित करून दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहिली.

या वेळी भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या यशस्वी आणि महान राजकारण्याला जन्म देणारी आई हिराबेन यांचे नाव चिरंतन अमर राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना खारघर मंडल भाजपचे सरचिटणीस दीपक शिंदे म्हणाले की, हिराबेन या साधेपणाचे प्रतीक होत्या तसेच भक्ती, तपश्चर्या आणि कर्म यांच्या त्रिवेणी होत्या. त्यांच्या दिवंगत आत्म्याला शांती लाभो व पंतप्रधानांच्या दु:खाच्या वेळी संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी उभा आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना देशसेवा करण्याचे बळ मिळो हीच मी ईश्वराजवळ प्रार्थना करतो.

या शोक सभेवेळी ब्रिजेश पटेल व दीपक शिंदे यांच्यासह पनवेल महापालिका माजी नगरसेवक रामजी बेरा, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, वैद्यकीय विद्यार्थी आघाडीचे प्रदेश संयोजक विजय उजळंबे, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, नवनीत मारू, अशोक जंगीड तसेच आश्रमातील अनेक निराधार वृद्धांनी श्रद्धांजली वाहिली.

# पनवेलमध्ये १५ जणांना 'पीएम स्वनिधी'चा लाभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकांना स्वावलंबी आणि सशक्त बनविण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या पीएम स्वनिधी योजनेचा लाभ पनवेल कोळीवाडा येथील १५ मच्छी विक्रेत्यांनी घेतला आहे. पनवेल महापालिकेमार्फत हा लाभ देण्यात आला.



कोरोना काळात छोट्या छोट्या व्यवसायाची स्थिती दयनीय झाली. अशा परिस्थितीत रस्त्यावर आपला व्यवसाय करणाऱ्यांना, फळे व भाज्या विक्रेत्यांना व अन्य छोट्या उद्योजकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. ही समस्या लक्षात घेऊन केंद्र सरकारने पीएम स्वनिधी योजना सुरू केली, ज्या अंतर्गत या लोकांना काम पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडून १०,००० रुपये कर्ज दिले जाते.

पनवेल कोळीवाडा येथील जरीमरी मंदिरात झालेल्या या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, हरिश्चंद्र भगत, पंच कमिटी सदस्य हरिश्चंद्र भोईर आदी उपस्थित होते. पांडूरंग शंकर भगत, भारत शंकर कोळी, वनिता विजय पाटील, विजय शंकर पाटील, प्रकाश महादेव शेलार, दीपक मधूकर भगत, हावलुबाई हरिश्चंद्र भोईर, हरिथंड तुकाराम भोईर, गौरी दत्ता पाटील, गणेश अशोक पाटील, संदीप रामचंद्र भगत, डायालाल लक्ष्मण देवलिया, विठाबाई राजेश भोईर, किरण मधुकर भोईर, सुधा गणेश श्रीवास्तव या मच्छी विक्रेत्यांनी पीएम स्वनिधी योजनेचा लाभ घेतला आहे.

## पीरवाडी किनारी '२०२२'ला निरोप

**उरण : वार्ताहर**

सरत्या वर्षाला बाय-बाय देण्यासाठी शेवटच्या सूर्यास्ताच्या वेळेस निरोप देण्यासाठी शनिवारी (दि. ३१) उरण शहराच्या पश्चिमेस असलेल्या पिरवाडी समुद्रकिनारी पर्यटकांनी खूप गर्दी केली होती.

२०२२ सालच्या शेवटच्या दिवशी होणारे सूर्यास्त वेळ व आकर्षक निसर्ग, मावळत्या सूर्याचे फोटो काढण्यात नागरिक, पर्यटक मग्न झालेले चित्र सर्वत्र दिसत होते. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समुद्र किनारी दर्शनी भागात नाका बंदी करण्यात आली होती.



पनवेल : येथील महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे यांनी दरवर्षीप्रमाणे नववर्ष दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशनावेळी भाजप नेते मोतीलाल कोळी, राज पाटील, विनायक म्हात्रे, महेश भगत, सुरेश म्हात्रे, रूपेश घाडगे, मंगेश ठाकूर, रूपेश अंबोलकर, रूपेश आठवणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



पनवेल : उरण दिघोडे भाजपच्या वतीने २०२३ सालची नवीन वर्षाची दिनदर्शिका भाजपचे कार्यकर्ते निलेश पाटील यांनी प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन उरणचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, मंगेश वाकडीकर, माजी सरपंच शेखर कानडे, विद्याधर जोशी, दिघोडे ग्रामपंचायतीच्या सरपंच सोनिया मयूर घरत, भाजप उरण तालुका सरचिटणीस प्रसाद पाटील, दिघोडे भाजप अध्यक्ष राजेश पाटील, मयूर पाटील, नरेश पाटील, युवा नेते राजेंद्र पाटील, नितेश सोळंकी आदी उपस्थित होते. (छाया : अक्षय शार्दुल)





पनवेल : भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी पाटील आणि पोसरी बूथ अध्यक्ष विशाल मुंढे यांना वाढदिवसानिमित्त उरणचे आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक बबन मुकादम, वासांबे विभागीय अध्यक्ष आणि माजी सरपंच सचिन तांडेल, पोयंजे पंचायत समिती अध्यक्ष प्रवीण ठाकूर, सावळे माजी सरपंच तथा गुळसुंदे विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, कसळखंड माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, पनवेल तालुका महिला मोर्चा चिटणीस शिल्पा म्हात्रे, दीपक दुर्गे आदी उपस्थित होते.



पनवेल : भाजपचे करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार व त्यांच्या सुविद्य पत्नी कविता शेलार यांच्या लग्नाचा ४२वा वाढदिवस शनिवारी झाला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शेलार दाम्पत्याला शुभेच्छा दिल्या. (छाया : योगेश पाटील)

# कॉपर कॉईल चोरणारे सराईत गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील विविध परिसरातून इलेक्ट्रीक ट्रान्सफॉर्ममधील कॉपर काईल व इन्सुलेशन चोरणाऱ्या सराईत दुकलीला पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून पोलिसांनी लाखोंचा माल हस्तगत केला.

पनवेलमधील विविध इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मर मधून लाखो रुपये किमतीचे कॉपर काईल चोरी गेल्याच्या घटनेत वाढ होत होती. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने गुप्त माहितीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी अबुलआस वारीस अली समानी (वय ३४) आणि मुनावर सफेदद्दिन खान (वय ३४) यांना ताब्यात घेतले.

तपासात त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी पुष्पक नोड तसेच कुंडेवहाळ येथे स्टोन क्रशर करिता बसवलेल्या इलेक्ट्रीक ट्रान्सफॉर्मर मधून त्याचप्रमाणे साईनगर येथील महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर मधून लाखो रुपये किमतीचे कॉपर कॉईल, कॉपर वायंडींग व इन्शुलेशनची चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून एकूण एक लाख ३४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या सराईत दुकलीच्या अटकेने पनवेल परिसरातील आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# सिनेमाच्या यशाचा एक मार्ग इराणी हॉटेलमधून...


**सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात मी गिरगाव चौपाटीवरील भवन्स कॉलेजमध्ये असताना आम्हा मित्रांचे टोळके गावदेवीच्या सिग्नलजवळील न्यूयॉर्क इराणी हॉटेलमधील ज्यूक्स बॉक्समध्ये आठ आण्याचे नाणे टाकून गाणी ऐकण्यात रस घ्यायचो असे मी लिहीले अथवा बोललो की, आजच्या डिजिटल युगात यू ट्यूबवर 'हवं तेवढेच गाणे' ऐकणाऱ्या युवा पिढीच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव दिसतात. गाणे ऐकायला असे जायचे म्हणजे असा प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. आज अनेक हॉटेलमध्ये बॅकग्राऊंडला म्युझिक ऐकायला मिळते. अप ग्रेड हॉटेलमध्ये डान्स फ्लोअरही असतो. अनेकांना नाचावेसेही वाटते. आणि त्याही पलिकडे जायचं तर डान्स बार कल्चर हीदेखील एक संस्कृती सांगता येते. या सगळ्याची मुळे शंभर सव्वाशे वर्षांपूर्वीच मुंबईत (विशेषत: दक्षिण मुंबईत) आलेल्या/रुजलेल्या/आपली एक वेगळीच ओळख असलेल्या इराणी हॉटेलमध्ये असावीत.**


झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक




चित्रपटाच्या प्रवासात बहुस्तरीय असा इराणी हॉटेलचा वाटा नक्कीच आहे. चित्रपट आणि त्याच्या विश्वाची जडणघडण, व्याप्ती, प्रभाव असा बहुरंगी आहे.

अनेक जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सजवळच इराणी हॉटेल असल्याचे दिसेल. कदाचित तो योगायोग असेल. न्यू एम्पायर (आता बंद आहे म्हणा)च्या शेजारीच असलेल्या मॅकडोनाल्डच्या जागी इराणी हॉटेलच होते. आसपासच्या न्यू एम्पायर, स्टर्लिंग, कॅपिटॉल, न्यू एक्सलसियर येथे कोणताही इंग्लिश अथवा हिंदी चित्रपट पाहायचा आणि याच इराणी हॉटेलमध्ये चहा, ब्रून मस्का, खारीवर ताव मारत त्या पिक्चरवर किमान तास दीड तास उलटसुलट गप्पा करायच्या हे आम्हा मित्रांमध्ये फिक्स होते. अतिशय ऐसपैस जागा असल्याने गप्पाही खुलत. त्या काळात पिक्चरही तसेच बनत आणि ते पडद्यावर राहत नसत. मेंदूत आणि हृदयात शिरत. त्याची थीम, अभिनय, दिग्दर्शन, गीत संगीत नृत्य अगदी पोस्टरवर बोलावेसे आणि ऐकावेसेही वाटे. असेच फिल्मी जगणारे अनेक ग्रुप असत. ती त्या काळातील 'सिनेमासोबत जगण्याची पद्धत' होती. मेट्रो थिएटरसमोर गिरगावकडे जाताना समोरासमोर दोन इराणी (एका बाजूचा कयानी आजही सुरु), आमच्या गिरगावातील सेन्ट्रल थिएटरसमोर इराणी आहे, इंपिरियल थिएटरसमोरही इराणी...पिला हाऊस भागातील थिएटर्स संस्कृतीही इराणी हॉटेलसह..... आज दक्षिण मुंबईतील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्स एकेक करत बंद पडली आणि काही इराणी हॉटेलही बंद पडली, पण एकेकाळी पिक्चर एन्जॉय केल्यावर अनेकदा तरी पुढचा कट्टा इराणी हॉटेल असे. अवतीभवतीच्या आरशात एकदा पाहून झाले की गप्पांत रंगत. कधी कधी विचार करतो, इराणी हॉटेल नसती तर एकेका पिक्चरवर तास दीड तास गप्पा मारत कुठे बसता आले असते? कोणी सहारा आणि स्वातंत्र्य दिले असते? घुसमट झाली असती हो. चित्रपट रसिकांच्या किमान चार पिढ्यांनी, विशेषत: यंगस्टर्सनी इराणी हॉटेलमध्ये बसून पिक्चरवर बोलणे/सांगणे/जगणे पसंत केले. आणि त्यासह चित्रपटही रुजवला.

काही इराणी हॉटेलमध्ये ज्यूक्स बॉक्स असे. एक छान म्युझिकल कोपरा. माणूस जगत जाताना त्याला जस जशा नवीन गोष्टी समजत जातात, आजूबाजूच्या जगाची ओळख होत जाते तसा मी कॉलेजमध्ये गेल्यावर इराणी हॉटेलमधील ज्यूक्स बॉक्सशी झालेली ओळख मग घट्ट मैत्रीत झाली. आठवणीत राहिलीय. त्या बॉक्समध्ये आठ आण्याचे नाणे टाकून एक गाणे प्रेस करायचो आणि त्या बदल्यात किमान दहा-बारा गाणी सहज ऐकून होत, कारण इतरांनीही नाणे टाकून आवडते गाणे निवडलेले असे. माझी सर्वाधिक पसंती किशोरकुमारला. विशेषत: देव आनंद व किशोरकुमार कॉम्बिनेशनची तीन देविया, प्रेम पुजारी, जॉनी मेरा नाम, गॅम्बलर, हरे राम हरे कृष्ण, छुपा रुस्तम यातील गाणी हमखास ऐकायचो. राजेश खन्ना व किशोरकुमार या केमिस्ट्रीची आराधना, अमर प्रेम, कटी पतंग, दुश्मन, मेरे जीवन साथी, दाग, अजनबी असा खजिनाच होता. मोहम्मद रफीही आवडता पाश्वगायक.



१ ऑगस्ट १९८०ची सकाळ मोहम्मद रफीच्या निधनाच्या बातमीने झाली. आदल्या दिवशी म्हणजे ३१ जुलै १९८० रोजी त्यांचे निधन झाले. खिशात असतील नसतील तेवढी आठ आण्यांची नाणी ज्यूक्स बॉक्समध्ये टाकून मनसोक्तपणे रफी ऐकला होता. ज्यूक्स बॉक्स हा अनेक चित्रपट संगीत शौकिनांचा फारच मोठा आधार होता. चित्रपट संगीताच्या प्रसाराचे ते एक महत्त्वाचे माध्यम होते. असे ज्यूक्स बॉक्सवाले इराणी त्या काळात स्पेशल वाटत. गाण्यावरुन किस्से, आठवणी, गोष्टी, दंतकथा चर्चेत असतच. म्हटल तर एक प्रकारचा चित्रपट संगीताचा अभ्यासही होई.

कालांतराने चित्रपटसृष्टीत नावारुपाला आलेल्या कलाकार/निर्माते/दिग्दर्शक/गीतकार/संगीतकार/पार्श्वगायक अशा त्या काळातील म्हणजेच पन्नास, साठ, सत्तरच्या दशकातील अनेकांचा इराणी हॉटेल संस्कृतीशी संबंध आलाच. एक उदाहरण, राजेश खन्नाचे! मूळचा तो आमचा गिरगावकर. ठाकूरव्दार नाक्यावरील सरस्वती निवासमध्ये राहणारा. त्याच्या अगदी घरासमोरचे सनशाईन इराणी रेस्टॉरंट अलिकडेच बंद पडले. ११८ वर्षे इतके त्याचे आयुष्य होते. आणि अनेक क्षेत्रातील अनेक जण कधी ना कधी या इराणी हॉटेलमध्ये आलेच. राजेश खन्ना अनेकदा तरी झाबवा वाडीतील डॉ. अरुण परुळेकर यांच्याकडे आईच्या औषधासाठी गेल्यावर मग आपल्या एका गुजराती मित्रासोबत याच सनशाईनमध्ये येऊन फाईव्ह फाईव्ह फाईव्ह ओढत बसायचा. डोली, नौनिहाल, औरत असे सुरुवातीचे आपले काही चित्रपट फ्लॉप झाल्यावर तो येथेच दिसायचा असे आज वयाची सत्तरी गाठलेले गिरगावकर सांगतात. 'आराधना' (१९६९)च्या यशानंतर काही काळाने तो वांद्र्याच्या कार्टर रोडवरील आशीर्वाद बंगल्यात राहायला गेला.

वांद्रे परिसरातही अनेक इराणी रेस्टॉरंट असून अनेक फिल्मवाल्यांच्या आपल्या काही आठवणी निश्चित असतील आणि इराणी हॉटेलमधील चित्रपट शूटिंग हादेखील एक रंजक विषय आहे. गोविंद निहलानी दिग्दर्शित 'अर्ध सत्य' (१९८३) या चित्रपटाचे शफी इनामदार व ओम पुरी यांच्यावरील एका दृश्याचे चित्रीकरण धोबीतलावच्या कयानी या इराणी हॉटेलमध्ये झाले अशी आठवण या चित्रपटाच्या वेळी गोविंद निहलानी यांचा प्रमुख सहाय्यक दिग्दर्शक असलेल्या राजू पार्सेकरने मला सांगितली. एन. चंद्रा दिग्दर्शित 'तेजाब' (१९८८) इत्यादी चित्रपटात तसेच काही जाहिरातीत इराणी हॉटेलमधील दृश्ये पाहायला मिळाली. प्रार्थना समाजच्या कॉर्नरवरील इराणी हॉटेलमध्ये दिग्दर्शक मनमोहन देसाई पाव अथवा केक घ्यायला आल्याचे दिसे. ते जवळच खेतवाडीतील प्रताप निवासमध्ये राहत.

विजू खोटे हा आयुष्यभर गावदेवीचा रहिवाशी. अनेकदा तो तेथील इराणी हॉटेलमधील मोठी खारी बिस्किट घेऊन शूटिंगला जाऊन आपल्या सहकाऱ्यांसह त्याचा आस्वाद घेई.

इराणी हॉटेल आणि चित्रपटसृष्टी अशा नात्याचा हा झक्कास प्रवास आहे. चित्रपटाच्या इतिहासात/वाटचालीत इराणी हॉटेलचाही हिस्सा आहेच. त्याची अशी नोंद घ्यायला हवीच.

**कालचक्र कधी थांबत नसते. ते अविरतपणे सुरूच असते. असे असले तरी हल्लीच्या गतिमान युगात दिवस, महिने, वर्षे कशी भर भर पुढे सरकत आहेत. आता हेच बघा ना मागील वर्ष हा हा म्हणता सरून नवे वर्ष कधी सुरू झाले ते कळलेदेखील नाही. नव्या वर्षाची दिनदर्शिका घरच्या भिंतीवर लटकू लागली असून यंदा कधी, काय करायचे यावर आतापासूनच विचारमंथन केले जाऊ लागले आहे.**

# नवे वर्ष, नवा उत्साह!




नवे वर्ष म्हटले की नवे संकल्प ओघानेच आले. अनेक जण वर्षारंभी वेगवेगळे संकल्प करीत असतात. कुणी व्यायामाचा करतो, तर कुणी वाचनाचा, कुणी बचतीचा, तर कुणी व्यसनमुक्तीचा. अगदी वृक्षारोपण, समाजसेवा यांचेही संकल्प केले जातात. त्यासाठी स्वतंत्र वेळापत्रक आखले जाते. सुरुवातीला त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते, मात्र नव्याची नवलाई नऊ दिवस या प्रमाणे केलेला संकल्प बऱ्याचदा अर्धवट राहतो. फार कमी लोक तो सिद्धीस नेतात. मानसशास्त्रानुसार कोणतीही गोष्ट सलग २१ दिवस करीत राहिल्यास त्याची आपल्याला सवय लागते. खरंतर आपापल्या आवडीनिवडीनुसार कोणताही निश्चय करा, पण तो पूर्ण करण्यासाठी त्याला ध्येय मानून प्रयत्न करायला हवा. मुख्य म्हणजे एकदम शेवटचे टोक गाठण्याचा विचार न करता त्या दिशेने एक एक पाऊल टाकल्यास हळूहळू ध्येयापर्यंत पोहचता येऊ शकते.

वैश्विक महामारी कोरोनाच्या दोन वर्षांनंतर सरते वर्ष कसे भुर्रकन निघून गेले. कोविड काळात सारे काही ठप्प झाले होते. त्यामुळे सर्वत्र 'बंद'सारखे चित्र पहावयास मिळत असे. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यावर निर्बंध उठले आणि जनजीवन पूर्वपदावर आले. खासकरून सण-उत्सव पूर्वीप्रमाणे उत्साहात साजरे होऊ झाले. त्यामुळे आनंदाला उधाण आले. त्यात वेळही पटकन गेला. आता पुन्हा एकदा चीनसह अन्य काही देशांमध्ये कोरोना डोके वर काढू लागल्याचे वृत्त आहे. हे कोरोनारूपी भूत मानवाच्या मानगुटीवर उतरण्याचे काही नाव घेत नाहीये. कोरोना संकट अचानक येते आणि मध्येच जाते. सर्व काही सुरळीत झाले की पुन्हा कोरोना कसा काय वाढू लागतो हे अनाकलनीय आहे. खरंच तो आहे की त्याचा बागूलबुवा केला जातोय?

आणखी एक नमूद करण्यासारखी बाब म्हणजे प्रसारमाध्यमांनी विशेषतः चोवीस तास सुरू असणाऱ्या वृत्तवाहिन्यांनी नकारात्मक बातम्या प्रसारित न करता या संदर्भात शासकीय पातळीवर जे काही निर्णय, उपाययोजना होत असतात ते दाखविण्यास प्राधान्य दिले पाहिजे. नाहीतर अनेक वाहिन्या सनसनाटी बातम्या दाखवण्याच्या नादात कोरोनाचे भय पसरवितात. उरलीसुरली कसर सोशल मीडियातून भरून निघते. फरक फक्त एवढाच आहे की सोशल मीडियात दोन्ही बाजूंनी मते व्यक्त करता येतात. कोरोनाचा पूर्वानुभव पाहता कोविड विषाणूच काय पण इतर कोणातही रोग, साथ पसरू नये याकरिता प्रत्येकाने नियम पाळून काळजी घेतली पाहिजे हेही तितकेच खरे!


भले बुरे ते घडून गेले असे म्हणत सर्वांनी सरत्या वर्षाला निरोप देऊन जीवनगाणे नव्याने सुरू केले आहे. आयुष्यात सुख-दुःख अनुभवतच पुढे जावे लागते. अशावेळी आपुलकीचा आधार महत्त्वाचा ठरतो, कारण माणूस हा समाजशील प्राणी आहे. एकमेकांच्या सोबतीने मार्गक्रमण केल्यास प्रवास कसा सुकर व सुखकर होतो. नव्या युगात माणूस नेमके हेच तो विसरलाय आणि मी व माझे कुटुंब यात गुरफटलाय. स्वतःसह परिवाराचा विचार करणे यात काही गैर नाही, परंतु त्याचबरोबर इतरांसाठीसुद्धा काही करता आले तर त्याहून दुसरा मोठा आनंद नाही. म्हणूनच केवळ स्वतःपुरते मर्यादित न राहता समाजासाठी काही तरी योगदान दिले पाहिजे. त्याचवेळी आप्त, मित्रमंडळी यांनाही जपले पाहिजे. असं म्हणतात की, दुसऱ्याच्या दारात एखादे झाड लावले तर त्याची फुले आपल्याच दारात पडतात...

दैनंदिन कामकाजासाठी अनुसरल्या जाणाऱ्या नव्या इंग्रजी वर्षाला प्रारंभ झाला असताना त्याचे स्वागतही नव्या उत्साहाने करण्यात येत आहे. चालू वर्ष उमेदीचे, आशा-आकांक्षा पूर्ण करणारे अन् आरोग्यदायी असावे अशीच प्रत्येकाची मनीषा असेल. मंडळी, जर काही साध्य करायचे असेल तर त्यासाठी परिश्रम घेणे आवश्यक असते. कष्टाला पर्याय आणि यशाला शॉर्टकट नसतो. समर्थ रामदासस्वामींच्या उक्तीनुसार कष्टाविना फळ नाही तसेच जर कष्ट न करता सहजासहजी काही मिळाले की त्याचे मोल नसते. म्हणून सर्वप्रथम आपण स्वतः आपल्या कामावर प्रेम केले पाहिजे. आपले काम आपल्याला आवडले तर ते इतरांनाही नक्कीच आवडेल. झोकून देत काम करून यशाची अनुभूती घेण्याचा आनंद अवर्णनीय असतो. त्यासाठी सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-समाधान पाटील, पनवेल**

# फुटबॉलसम्राट पेले

त्रेस कोराकोएस या एका छोट्याशा शहरात जन्मलेल्या एडसन आरंटस डो नासिमेटो उर्फ पेले यांची फुटबॉल या खेळात लोकप्रिय व प्रभावी व्यक्तींमध्ये कारकीर्द गणल्या जाते. पेले यांच्या वडिलांना फुटबॉलची आवड असल्याने मुलालादेखील फुटबॉलमध्ये प्रोत्साहन दिले, पण वडिलांना गुडघ्याच्या दुखापतीमुळे खेळता आले नाही. मग पेले यांना वयाच्या ११व्या वर्षी सॅनटॉस क्लबच्या युवा संघात दाखल करण्यात आले. ५ फूट ८ इंच उंची असलेला कमी वयाच्या फुटबॉलपटूंमधील कलागुण, कौशल्य स्थानिक खेळाडूने हेरून १६व्या वर्षी व्यावसायिक फुटबॉलमध्ये संधी देण्यात आली. अगदी जेमतेम १७-१८व्या वर्षी प्रथमतः स्वीडन येथे होऊ घातलेल्या विश्वचषक स्पर्धेत ब्राझीलकडून खेळण्याची संधी मिळाली. १९५८च्या विश्वचषकात राखीव खेळाडू म्हणून सुरुवात झाली, पण स्पर्धा संपेपर्यंत ते ब्राझीलचे प्रमुख खेळाडू बनले. विश्वचषकात सर्वांत लहान वयात प्रतिस्पर्धी संघातील बचावपटूंच्या डोक्यावरून चेंडू 'फ्लिक' करीत नंतर उत्कृष्ट फटका मारून पहिला गोल नोंदविला होता.हा विश्वचषकातील इतिहासातील सर्वोत्तम गोल समजल्या जातो.



१९५८च्या विश्वचषकापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर फुटबॉल खेळाचा उल्लेख झाल्यास पेलेची आठवण आल्यावाचून राहत नाही. इतर खेळाडूंच्या चालीचा अंदाज घेऊन चेंडूवर नियंत्रण ठेवून अचूक किक मारण्याची क्षमता अनेकांना प्रेरक ठरते. चेंडू पायात खेळवत ठेवून प्रतिस्पर्धी संघाच्या गोलकक्षात धडकून गोल करणे ही त्यांची वैयक्तिक खासियत होती. बाजूने हवेतून फुटबॉल जवळ आल्यावर स्वतःला जागा करून घेत 'बायसिकल किक'ने गोल करणे हीच तर पेले यांची खरी ओळख होती. त्यामुळे जेव्हा जेव्हा फुटबॉलचा विषय येतो तेव्हा तेव्हा ब्राझीलच्या पेले या फुटबॉलपटूची आठवण होते. ते काळाच्या पडद्याआड गेल्याने क्रीडाविश्वातील हानी झाली.

फुटबॉलसम्राट पेले यांनी सर्वाधिक चार विश्वचषकात सहभाग घेतला. त्यापैकी तीन विश्वचषकांवर त्यांच्या संघाने नाव कोरले आहे. ब्राझील या देशाचे प्रतिनिधित्व करीत असताना १९५८, १९६२, १९६६, १९७० अशा सलग चार विश्वचषकांत १४ सामन्यांमध्ये एकूण १२ गोल केले आहेत. १९६६च्या विश्वचषकामध्ये ब्राझीलचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आल्याने निवृत्तीचा निर्णय घेण्याची तयारी दर्शविली, परंतु त्यांचे मन वळविण्यात ब्राझीलकर यशस्वी झाल्याने पुन्हा १९७०मध्येदेखील विश्वचषकात सहभाग घेऊन विजेतेपद पटकाविले.१ ९६६ सालातील अपवाद वगळता तीनही विश्वचषकात पेले यांनी आपली मोहोर उमटविण्यात यशस्वी ठरले. साओ पावलोच्या रस्त्यांवर सुरुवात झालेला प्रवास पेले यांना फुटबॉलच्या शिखरापर्यंत घेऊन गेला. फुटबॉलमधील सर्वकालीन सर्वोत्तम खेळाडूंबाबत चर्चा करताना दिएगो मॅराडोना, लिओनेल मेस्सी, रोनाल्डो यांच्यासह पेले यांचे नाव घेतले जाते. फुटबॉल इतिहासातील महानतम खेळाडूंपैकी एक असलेले पेले हे विक्रमवीर ठरले. पेले यांनी आंतराष्ट्रीय सामन्यात ब्राझीलचे प्रतिनिधित्व करतांना एकूण ७७ गोल नोंदविले. आजतागायत हा विक्रम पेले यांच्याच नावावर होता, मात्र नुकताच झालेल्या विश्वचषक स्पर्धेदरम्यान त्यांच्याच देशातील नेयमार या फुटबॉलपटूने विक्रमाशी बरोबरी साधली.

भारत देशात पेले यांनी तब्बल तीनदा भेटी दिल्या आहेत. त्यांनी फुटबॉलपटू म्हणून नाही तर खेळाचा दूत म्हणून लोकांची मने त्यांनी जिंकली होती. १९४०मध्ये जन्मलेल्या पेलेंच्या वयाच्या ५०व्या वर्षी मैत्रीपूर्ण सामन्यात ब्राझीलचे कर्णधारपद भूषविले होते. फुटबॉलच्या मैदानात ज्याप्रमाणे पेले लोकप्रिय होते अगदी तसेच मैदानाबाहेरदेखील चर्चेत राहून 'युनेस्को'चे शांतता राजदूत म्हणून कार्य केले. ते ब्राझीलचे क्रीडामंत्रीदेखील राहिले. ब्राझील देशात वा फुटबॉल संघटनेत होणारा भ्रष्टाचार दूर करण्यासाठी कायदा तयार करण्यात आला. त्याला 'पेले लॉ' म्हणून ओळखला जातो. पेले यांनी विविध माहितीपटात व लघुपटात काम केले आहे तसेच त्यांना संगीताची उत्तम जाण होती. ब्राझीलच्या सर्वोच्चपदी विराजमान होण्याचे स्वप्न मात्र अधुरे राहिले. ब्राझीलमधील लष्करशाही समोर मान न तुकविणारे ते पहिले कृष्णवर्णीय खेळाडू ठरले. आज लीगसारख्या व्यावसायिक स्पर्धांमध्ये विदेशी खेळाडू खेळत असतात, पण ब्राझील सरकारने पेले यांना कधीही यूरोपातील क्लब फुटबॉल खेळू दिले नाही. त्याचा तोटा किती झाला याचा हिशोब वा भांडवल पेले यांनी कधी केले नाही हे विशेष.

अर्जेंटिना व उरुग्वे या देशांचे प्राबल्य असलेल्या ब्राझील देशाने जिंकलेल्या विश्वचषक स्पर्धा म्हणजे ही राष्ट्रीय संपत्ती म्हणायला हरकत नाही. आजपर्यंत ब्राझीलने पाच विश्वचषक जिंकले असून त्यांची मुहूर्तमेढ पेले यांनी रोवली असे म्हटल्यास वावगे वाटणार नाहीच. वैश्विक म्हणविल्या जाणाऱ्या खेळात पेलेंसारख्या गोरेतर फुटबॉलपटूची बहरत गेलेली वेल अधिकच घट्ट होत गेली. दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी पेलेचे वर्णन करताना म्हटले की, लहान मुलाची उत्साही निरागसता, चेंडू मिळाल्याचा आनंद आणि तो न सोडण्याचा आग्रह मोठ्या माणसात सामावल्यावर कसा दिसेल तसे पेले खेळताना दिसत असत. पेले यांचे फुटबॉलवरील प्रेम हे अंथरुणावर आतड्याच्या कर्करोगाशी झुंजत असतानादेखील त्यांनी फुटबॉल विश्वचषक स्पर्धा बघितली यावरून स्पष्ट होते. अखेर फुटबॉलचा बादशाह पेले काळाच्या पडद्याआड गेले. त्यामुळे क्रीडाविश्वातील भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे, परंतु पुढील काळासाठी त्यांचे व्यक्तिमत्त्व इतर खेळाडूंना प्रेरणादायी ठरल्यावाचून राहणार नाही. अशा या झुंजार खेळाडूला भावपूर्ण आदरांजली!

**-दुशांत निमकर, चंद्रपूर**

# गेल कंपनीतर्फे अलिबागच्या उसरमध्ये येणार नवा प्रकल्प

**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील उसर येथे केंद्र सरकारच्या अखत्यारीत उसर येथील गेल कंपनीच्या पॉलीप्रोपलिन प्रकल्प उभारणीच्या कामाला सुरुवात झाली आहे. पुढील या प्रकल्पासाठी आठ हजार कोटींची गुंतवणूक या प्रकल्पाच्या निमित्ताने केली जाणार आहे. तीन वर्षांत प्रकल्प उभारणीचे काम पूर्ण होईल, असा विश्वास कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक अनुप गुप्ता यांनी व्यक्त केला.




सध्या देशात पॉलीप्रोपलीनची मागणी ५४८० केटीए येवढी आहे. २०३०पर्यंत ही मागणी दुप्पट होणे अपेक्षित आहे. त्यामुळे भारत सरकारने मेक इन इंडीया उपक्रमा आंतर्गत पॉली प्रोपलीन निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले आहे. याच धोरणा आंतर्गत गेल कंपनी मार्फत उसर येथे ५०० केटीए प्रती दिवस क्षमतेचा पॉली प्रोपलीन प्रकल्प उभारला जाणार आहे. उत्तर प्रदेश आणि आसाम नंतर गेल कंपनीचा हा देशातील तिसरा आणि आशिया खंडातील सर्वात मोठा पॉली प्रोपलीन प्रकल्प असणार आहे.

उसर येथे पूर्वी गॅस प्रकल्प कार्यान्विय होता, मात्र गॅस पुरवठा बंद झाल्याने हा प्रकल्प बंद पडला होती. त्यामुळे कंपनीकडे असलेली जागा पडून होती. आता याच १३० हेक्टर जागेत पॉली पीडीएच टेक्नॉलॉजीवर आधारीत पॉली प्रोपलीन प्रकल्प उभारला जात आहे. याशिवाय एमआयडीसीकडे असलेली ६० हेक्टर जागा अजून मिळावी यासाठी कंपनीने मागणी केली आहे. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर २३० जणांना थेट तर जवळपास दिड हजार लोकांना कंत्राटी पध्दतीने रोजगार उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प पूर्णतः प्रदुषण विरहीत असणार असून कुठल्याही प्रकारचे सांडपाणी उत्सर्जन प्रकल्पातून होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे अलिबागमधील अर्थकारणाला गती मिळेल असा विश्वास पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी व्यक्त केला. या वेळी महाव्यवस्थापक विरेंद्र गुप्ता, प्रवीण लोखंडे आणि जितेन सक्सेना हेदेखील उपस्थित होते.

# नववर्षाच्या स्वागतासाठी मुरूडमध्ये पर्यटकांची गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटनात पटलावर नावारूपाला आलेल्या मुरूड व काशीद बीच समुद्र किनारा पर्यटकांनी फुलला असून रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या लांबचलांब रांगा लागलेल्या दिसून येत आहेत. मुंबईपासून १६० किलोमीटर अंतरावर असणारे मुरूड व काशीद या ठिकाणी पर्यटकांनी अधिक पसंती दिली आहे.

काशिद समुद्र किनारा भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील शुभ्र वाळू येथे पर्यटकांना आकर्षित करते. पर्यटकांच्या सोयी-सुविधात याठिकाणी असलेली स्पीडबोट, पॅरसेलिंगबोट, बनाना, बंफर तसेच घोडा-उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. याठिकाणी विविध खाद्य-पेय चहा-नाष्टा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. याठिकाणी दर शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात, परंतु यंदा सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक काशीद व मुरुड येथे दाखल होऊन मौजमजा करण्यात दंग झाले आहेत. काशीद येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांच्या रांगाच रांगा दिसून येत आहेत.

नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी काशिद-बिच व मुरूड समुद्र किनारा फुलला असून थर्टीफस्टसाठी लॉज बुकिंग फुल झाले आहेत. नववर्षाच्या स्वागतासाठी समुद्र किनारे पर्यटकांनी फुलले आहेत.

मुरूड समुद्र किनारी नगरपरिषदेतर्फे गाड्या पार्किंगसाठी व्यवस्था न केल्यामुळे येथील वाहतूक समस्या बिकट बनली होती. महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून पर्यटक हजारोंच्या संख्येने आल्याने मुरूड येथील हॉटेल व लॉजिंग व्यवसाय फार तेजीत सुरू होता. अफाट गर्दी मुळे सारा परिसर गजबजून गेला होता. समुद्र किनारीवरील सुद्धा अफाट गर्दीमुळे पर्यटक समुद्र स्नान, डू-इट सायकलसावरी, घोडेस्वारी, उंट सफारी याचा आनंद घेताना दिसत होते. सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला सुद्धा मागील दोन दिवसापासून पर्यटकांची गर्दी झेलत आहे. येथे सुद्धा तुफान गर्दी पहावयास मिळाली आहे.



(छाया : संजय करडे)

# कडावजवळ दुचाकी अपघातात दोघांचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील टाकवे गावासमोर शुक्रवारी (दि. ३०) रात्री अपघात झाला. या अपघातात दुचाकी वरून प्रवास करणारे सावळे गावातील दोन्ही तरुणांचा मृत्यू झाला. त्यामुळे सावळे गावावर आणि परिसरावर मोठी शोककळा पसरली आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत रात्रीच्या सुमारास सुझुकी कंपनीचा छोटा टेम्पो (एमएच ४६ बीयु २२२८) हा त्या वाहनाचा चालक कडाव कडून कशेळेकडे जात होता. त्यावेळी कडाव बाजू कडून कशेळेकडे जाणारी दुचाकी त्या टेम्पोवर आदळली. टाकवे येथील रूस्तम फार्महाउस येथे कडाव बाजुकडुन कशेळे बाजुकडे जाणाऱ्या रोडवर समोरून कशेळे बाजुकडुन कडात बाजुकडे जाणाऱ्या नवीन होंडा शाईन मोटरसायकलला अपघात झाला. त्या अपघातात मोटरसायकल चालक तानाजी धुळे आणि त्या दुचाकीवरून प्रवास करणारा दीपक धुळे यांना लहान मोठ्या गंभीर जखमा झाल्या होत्या. मात्र काही वेळाने त्या दोघांचे मृत्यू या अपघातात झाले असून हे दोन्ही तरुण तालुक्यातील आणि अपघात स्थळापासून तीन किलोमीटर अंतरावरील सावळे गावातील तरुण असल्याने प्रचंड हळहळ व्यक्त होत आहे.

दुचाकीला अपघात झालेला असताना त्या अपघाताची कोणतीही माहिती संबंधित टेम्पोचालकाने पोलिसांना दिली नाही आणि तेथून पळ काढला. त्यामुळे स्थानिक संतप्त झाले होते. त्यामुळे पोलिसांनी दुचाकीचे नुकसान केल्याप्रकरणी आणि अपघाताची खबर न देता अपघातग्रस्त टेम्पो तेथेच सोडुन पळुन गेल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार ए. एम. वडते करीत आहेत.

# खंडाळा घाटात टेम्पो उलटला

## एकाचा मृत्यू; दोघे गंभीर जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खंडाळा घाट क्षेत्रात अपघातांची मालिका सुरूच आहे. शनिवारी पहाटे साडे दहा वाजण्याच्या सुमारास माल वाहतुक करणारा आयशर टेम्पो उलटून भीषण अपघात घडला. यात टेम्पो मधील एकाचा मृत्यू व दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. दोघे जखमींना सुरुवातीला खोपोली पालिका रुग्णालयात व नंतर एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.



जुन्या मुंबई-पुणे हायवे खंडाळा घाटात शिंग्रोबा मंदिराच्या अलीकडे असलेल्या वळणावर विरुद्ध दिशेने आलेला आयशर टेम्पो अनियंत्रित होऊन उलटल्याने त्यातील सिमेंटचे पोल व अन्य साहित्य रस्त्यावर पडली. या अपघातात टेम्पोमधील तिघे जण गंभीर जखमी झाले. आपत्कालीन यंत्रणेने त्यांना खोपोली नगरपालिका रुग्णालयात आणले. या दरम्यान विशाल राजेंद्र गाडे (वय २५, रा. भोसरी, पुणे) याचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर चालक आकाश बळीराम खळगे (वय २८, रा. भोसरी, पुणे) दुसरी जखमी व्यक्ती इसाक मुसा शेख (वय २८, रा. भोसरी, पुणे) यांना खोपोलीतील पालिका रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी या दोघांना एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दोघांनाही गंभीर स्वरूपाच्या इजा आहेत.

# सुतारवाडी प्राथमिक शाळेला गणवेश भेट

**महाड : प्रतिनिधी**

एक उत्कृष्ट शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वीर सुतारवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना माणगाव मधील गोरगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण नवले यांनी खेळ खेळण्यासाठी लागणारे गणवेश भेट दिले.

महाड तालुक्यातील वीर सुतारवाडी प्राथमिक शाळा ही तेथील शिक्षकांमुळे नावारूपास आली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी येथील शिक्षकांनी प्रयत्न करत बंद पडण्याच्या दिशेने चाललेल्या शाळेची पटसंख्या वाढवण्यात यश प्राप्त केले आहे, असे सांगत नवले यांनी सर्व विद्यार्थ्यांना गणवेश भेट देऊन सधन पालकांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे.

या वेळी श्रीकृष्ण नवले यांनी मुलांना व पालकांना जीवनात आचरण कसे करावे, यश कसे संपादन करावे, देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता वाढविणे व जोपासणे, आई वडील, गुरुजन, मित्र व समाज यांचे जीवनात असणारे महत्व सांगून वर्तन कसे असावे याबदल सविस्तर मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थांना व शाळेस पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. गावाच्या नवनियुक्त सरपंच संध्याताई उमासरे यांनी ही मुलांना शुभेच्छा दिल्या. व नावले साहेब यांचे सपत्नीक आभार मानले.



(छाया : महेश शिंदे)

(छाया : सलीम शेख)



# अरुण पवार पुरस्काराने सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेजचे कर्मचारी प्रयोगशाळा सहाय्यक ज्येष्ठ पत्रकार अरुण तुकाराम पवार यांना संस्थेतर्फे आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार देण्यात आला आहे.

माणगाव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या विशेष उपस्थितीत सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

या वेळी संस्थेचे सेक्रेटरी कृष्णा गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, माणगाव नगरीचे उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, बाळासाहेबांची शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विनोद घायाळ, संस्थेचे पदाधिकारी नितीन बामगुडे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, नगरसेवक अजित तारळेकर,कपिल गायकवाड, राजेश मेहता,दिनेश रातवडकर, नगरसेविका शर्मिला सुर्वे, नंदिनी बामगुडे, ममता थोरे, रिया उभारे, सुविधा खैरे, लक्ष्मी हिलम, स्वीकृत नगरसेवक बाबुराव निंबाळकर, हेमंत शेट, द. ग. तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य बी. खामकर, सुधाकर नारायण शिपूरकर व गणेश वाघरे इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्राचार्य मनीषा मोरे आदींसह शिक्षक वर्ग, पालक, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेणमध्ये 'अंनिस'तर्फे व्यसनमुक्ती प्रबोधन

**पेण : प्रतिनिधी**

नववर्षाचे स्वागत दारूने आणि सिगारेटने करू नका. फटाक्यांचे धूर काढून प्रदूषण करू नका आणि पैसा उडवू नका त्यापेक्षा दूध पिण्याची सवय बाळगा असा सल्ला शेकडो पेणकरांना अंनिसच्या कार्यकर्त्यांनी दिला.

दारु पिणे, विडी-सिगारेट असे व्यसन करणे वाईट आहे आणि याचा अतिरेक केल्यास अतिसवय झाल्यास आयुष्य आणि कुटूंब बरबाद होवू शकते हे सांगण्यासाठी पेण नगरपरिषदा समोरील चौकात व्यसनाला अधिक बदनाम करण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या पेण शाखेतर्फे आयोजित करण्यात आला होता. या वेळी शाखेचे संदेश गायकवाड, डॉ. सावनी गोडबोले, गीता भानुशाली, प्रा. सतीश पोरे, अश्विनी ठाकूर, जगदीश दंगर, चंद्रहास पाटील, हबीब खोत, नितीन कदम, एन जे पाटील, सूर्यकांत पाटील यांनी जनजागृती करून दुधाचे वाटप केले.

३१ डिसेंबर हा दिवस नेहमीप्रमाणे असला तरी आता हा दिवस मौजमजा करण्याचा दिवस म्हणून कित्येक जण साजरा करू लागले आहेत आणि मौजमजा करायची म्हणजे दारू पिण्याची, रात्रभर धिंगाणा घालायचा आणि बेधुंद होवून रात्री-पहाटे घरी जावून भांडणे करायची असा दिनक्रम होत चालला असून हे बदलण्यासाठी व्यसन कसे वाईट आहे. हे सांगण्यासाठी पेण शाखेने 'द-दारूचा नाही, तर द-दुधाचा' या टायटल खाली चक्क दुधाचा एक ग्लास प्रत्येकाला देण्याचा उपक्रम दरवर्षी राबवून जागृती करत असतो, असे या वेळी सावनी गोडबोले यांनी सांगितले.



(छाया : अनिस मनियार)

# दिनेश रातवडकरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीचे वार्ड क्रमांक १७ चे नगरसेवक व जुने माणगाव येथील रहिवाशी दिनेश रातवडकर यांनी राजिप शाळा जुने माणगाव येथील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले.

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील राजिप मराठी शाळा येथील विद्यार्थ्यांसाठी वनभोजनाचा कार्यक्रम बुधवारी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी नगरसेवक दिनेश रातवडकर यांनी या कार्यक्रमास सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात नेहमीच विद्यार्थ्यांना तसेच तरुणांना प्रोत्साहन देणारे नगरसेवक दिनेश रातवडकर यांनी आपल्या नगरसेवक पदाच्या कारकिर्दीत आपल्या कामकाजाची चुणूक सर्व ग्रामस्थांना दाखवून दिली आहे. त्यांच्या या कार्याचे कौतुक सर्वत्र होत आहे. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत चांगले संस्कारक्षम शिक्षण घेऊन त्यांनी आपले भवितव्य उज्वल करावे असे मार्गदर्शन त्यांनी या वेळी विद्यार्थ्यांना केले. या वेळी शाळेचे शिक्षक तसेच हद्दीतील माणगाव नगरीच्या माजी नगरसेविका माधुरी मोरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

**नमुना एन. डी.**

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/4008B2016 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AC2660 चे मालक **श्री. अरुण कृष्णा चव्हाण** यांचे तारीख १६/०४/२०१२ रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती अरुंधती अरुण चव्हाण, पत्ता - ए टाईप २३/५, सिडको कॉलनी, शंकर मंदिराजवळ सेक्टर १३, न्यू पनवेल. उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालयात निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - अरुंधती अरुण चव्हाण,**
**पत्ता - ए टाईप २३/५, सिडको कॉलनी, शंकर मंदिराजवळ सेक्टर १३, न्यू पनवेल.**

# 'पद्मदुर्ग'च्या मावळ्यांकडून तोफांचे संरक्षण


**मुरूड : प्रतिनिधी**

राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला हा मुरूड समुद्रकिनाऱ्यापासून तीन किलोमीटर अंतरावर आहे. किल्लाचे व मावळ्याच्या सुरक्षेतेसाठी व शत्रुवर हल्ला करण्याकरिता तोफा याठिकाणी अस्तित्वात होत्या, परंतु रोजच्या रोज सागराच्या लाटांच्या जोरदार तडाख्याने आणि खाऱ्या पाण्यामुळे तटबंदीचा दगड झिजून किल्ल्याची पडझड सुरू झाली आहे. पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीच्या मावळ्यांनी या तोफांना संरक्षण दिले आहे.



पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीच्या मावळ्यांनी चार फुट समुद्रात जाऊन दोन तोफांचा शोध घेतला. तर त्याचठिकाणी एक तोफ पुळणीत दिसल्याचे निर्दशनास आले तोफां जड असल्याने रषीच्या साह्याने बांधण्यात आले. तोफांना पुन्हा किल्ल्यावर आणुन तोफा सुरक्षीत ठिकाणी ठेवून पुजन करण्यात आले. किल्ल्याची पडझड होऊन अवस्था एवढी बिकट झाली असुन लवकरच या ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्लाची डागडुगी करणे आवश्यक आहे नाहीतर हा नावापुरता किल्ला राहून इतिहास जमा होईल. याची भिंती मुरूडचे शिवप्रेमी-योगेश सुर्वे व महेश साळुंखे यांनी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांकरिता विशेष निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करून पहिले ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्लाचे संवर्धन करावे, अशी मागणी मुरुड शिवप्रेमी-योगेश सुर्वे यांनी केले. या वेळी आकाश मुळेकर व खारअंबोलीचे सर्व शिवप्रेमी उपस्थित होते.

# वाचनामुळे चांगल्या गोष्टीची प्रेरणा मिळते



-श्रीधर तिळवे नाईक
साहित्यिक
(बोरिवली, मुंबई)

वाचाल तर वाचाल
साहित्यिकांची आवडती पुस्तके

वाचनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. आजूबाजूच्या जगातील माहिती होते. माणूस अशिक्षित राहिला, तर त्याची सगळीकडून फसवणूक होते. वाचनामुळे आपण ज्ञान संपादन करतो, विचार शक्ती वाढते आणि आपल्याला चांगल्या गोष्टीची प्रेरणा मिळते. वाचनामुळे आपण सुशिक्षित होतो. समाजातील सर्वच शहरांच्या लोकांशी वागण्याची कला वाचनाने अवगत होते. शिकलेल्या माणसाला आपली प्रगती करता येते. हल्लीचे पालक मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत खूप जागरूक असतात. त्यांना सुविधा आणि सुशिक्षित करण्याकडे, चांगले घडविण्याकडे त्यांचे लक्ष असते. मुलांच्या प्रगतीत पालकांचा वाटा असतोच. मुलांनी मागे न राहता जगाबरोबर धावावे, याकडे त्यांची धडपड असते, कल असतो. त्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी 'वाचाल, तर वाचाल' हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश लक्षात ठेवला पाहिजे.



वाचन ही एक बहुमूल्य सवय आहे. ज्या व्यक्तीला आयुष्यात यश व आत्मसंमान प्राप्त करायचे आहे त्यांनी पुस्तक वाचन करायला हवे. वचन व्यक्तीच्या शक्तीला योग्य दिशा प्राप्त करून देते. वाचन कल्पनाशक्ती वाढवते. व्यक्तिमध्ये धैर्यचा संचार करते. तुम्ही प्रवासवरील पुस्तके वाचून पूर्ण जगाचा प्रवास करू शकतात.

## मी गोष्टीत मावत नाही -डॉ. सुधीर देवरे (प्रकाशक : पद्मगंधा प्रकाशन, पुणे)

गेली काही वर्षे मी मांडत असलेल्या चौथ्या नवतेला धरून अनेक कादंबऱ्या येतायत त्यातील दोन कादंबऱ्या मी वाचल्या पहिली नव्वदोत्तर सुधीर देवरे ह्यांची मी गोष्टीत मावत नाही ही आहे अहिराणी भाषेच्या अभ्यासासाठी प्रसिद्ध असलेल्या देवरेंनी इथे आत्मपरीक्षणाच्या परखड मायक्रोस्कोपखाली स्वतःला ठेवून आसपासचा माहोल चित्रित केला आहे वास्तव चित्रण आणि चिकित्सा ह्या दोन्ही गोष्टी इथे सतत एकत्र चाललेल्या दिसतात मूल्यव्यवस्था कोसळताना होणारा त्रागा आणि तरीही स्वतःला पॉझिटिव्ह ठेवणारा नायक इथे सतत प्रयत्नशील राहतो.




## चतुर -प्रणव सखदेव (प्रकाशक : रोहन प्रकाशन)



प्रणव सखदेवची चतुर यामध्ये त्याला युवा साहित्य अकादमी मिळाल्याने तो आता काय नवे काय लिहिणार असा प्रश्न होता पण त्याने तो सोडवला आहे. चौथ्या नवतेच्या कादंबरीची सर्व वैशिष्ट्ये ह्या कादंबरीत आढळतात फिक्शन आणि रियॅलिटीचे पुसलेले अंतर डिजिटॅलिक वृत्तांताचे समपर्क वापरण , खुद्द लेखकच नायक असणे आणि तो खरा आहे कि फिक्शन आहे हे शेवटपर्यंत न कळणे अशा अनेक वैशिष्ट्यांनी ही कादंबरी गजबजलेली आहे प्रणव हे लिहिताना ओलावा हरवू देत नाही एका व्यक्तीचा इनोसन्सचा होत चाललेला नाश एकाच वेळी हळुवार आणि तटस्थ पद्धतीने ह्यात सांगितला जातो.

## सिंधुकालीन लिपी आणि भारतीय भाषांचा इतिहास -रवींद्र इंगळे चावरेकर (हस्ताक्षर प्रकाशनगृह, नांदेड)



रवींद्र इंगळे चावरेकर ह्याचे सिंधुकालीन लिपी आणि भारतीय भाषांचा इतिहास हे पुस्तक आमच्या पिढीत इतिहासकार काय करतायत हा प्रश्न सतत विचारला जातो त्याला हे काम उत्तर आहे. माझे त्यांच्याशी अनेक मतभेद असूनही मी हे पुस्तक वाचण्याची शिफारस करेन भारतीय लिप्या त्यांची उत्क्रांती त्या मागचे संस्कृतीकारण ह्यांचा अत्यंत खोलात जाऊन लेखकाने मागोवा घेतला आहे चौथ्या नवतेत चिन्ह आणि नेट ह्या गोष्टी केंद्रीय असतात त्यात लिप्याचा रोल अतिशय महत्वाचा असतो इथे चिन्हांच्या दृश्यरूपाचें उत्खनन केलेले आहे आणि त्यानिमित्ताने भारतीय संस्कृतीच्या इतिहासावर प्रकाशझोत टाकला जातो.

# करंजाडेत सिडकोची तोडक कारवाई थांबवली

**उरण : बातमीदार**

सिडकोबाधित करंजाडेच्या ग्रामस्थांनी एकत्रित येऊन गावाची सध्यस्थितीत झालेली वाढ आणि विस्तार लक्षात घेऊन शासनाला शेवटच्या बांधकामापर्यंत सीमांकन करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि जिल्हाधिकारी रायगड यांना या बाबी तातडीची सुनावणी घेऊन आम्हाला न्याय देण्याचा आदेश काढलेला होता. तरी सुद्धा करंजाडे गावातील भुखंड क्रमांक १०० येथे स्थानिक प्रकल्पग्रस्ताने नैसर्गिक वाढीपोटी केलेल्या बांधकामावर सिडकोमार्फत होणाऱ्या तोडक कारवाईला ग्रामस्थांनी संविधानिक मार्गाने विरोध केला.

या बाबी मुंबई उच्च न्यायालय याचिका क्रमांक डब्ल्यूटी १४३४६/२०२२ अन्वये जिल्हाधिकारी रायगड आणि महाराष्ट्र शासनाला दिलेला आदेशाच्या आधारे पोलीस प्रशासनाला सिडकोच्या नियमबाह्य तोडक कारवाईचे समर्थन न करून पोलीस संरक्षण न देण्यासाठी पाचारण केले.



नवी मुंबई पोलीस परिमंडळ २ चे उपायुक्त पंकज डहाणे, सिडकोचे दक्षता अधिकारी श्री. मेंगडे आणि पनवेल शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना लेखी विनंती केली की त्यांनी करंजाडे ग्रामस्थांचा माननीय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याचा दाखला तपासुन पहावा आणि मगच तोडक कारवाईचे समर्थन करावे अथवा त्यासाठी पोलीस संरक्षण द्यावे. सिडको अतिक्रमण विभागामार्फत वरील नमुद भुखंडावर असलेले बांधकामावर गुरुवारी (दि. २९) तोडक कारवाई करण्याचे प्रयोजन होते. तशी लेखी सुचना बांधकाम धारकास प्राप्त झालेली होती. न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणात आमची याचिका तपासावी तसेच त्या याचिकेवर उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन होईपर्यंत तोडक कारवाईसाठी पोलीस संरक्षण देऊ नये, असे आवाहन करण्यात आले. पोलीस आणि सिडको प्रशासनाने उच्च न्यायालयाचा आदेश डावलुन केलेली कारवाई म्हणजे माननीय उच्च न्यायालयाचा अवमान असेच समजावे लागेल असे विनंती अर्ज देण्यात आले.

### ग्रामस्थांनी मानले आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार

*आमच्या या लढ्यात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि इतर लोकप्रतिनिधींनी मध्यस्ती करून आम्हाला मोलाची साथ दिली त्याबद्दल आम्ही आमदार साहेबांचे जाहीर आभार मानतो. पोलीस आणि सिडको प्रशासनाने न्यायालयाचा आदर करत होणारी कारवाई थांबवली त्याबद्दल त्यांचे सुद्धा आभार मानतो. गावठाण चळवळ, कायद्याची जाण आणि ग्रामस्थांची एकजुट यामुळे हे शक्य झाले असे मत प्रकल्पग्रस्तांचे नेते, गावठाण विस्तार संकल्पक राजाराम पाटील यांनी व्यक्त केले.*

# तुर्भेतील झोपडपट्ट्यांमध्ये अनैतिक व्यवसाय

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे सेक्टर १९ एफ येथील मोकळ्या भुखंडावर भुमाफियांकडून अनधिकृत झोपडपट्टी, व्यवसायिक गाळे व वाहन पार्किंग तळ निर्माण करण्यात आले आहे. यातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाण घेवाण होत असल्याची दाट शक्यता असून या झोपडपट्ट्यांमध्ये अनैतिक व्यवसाय सुरू असून या अनैतिक व्यवसायांचा त्रास सामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. याबाबत भाजपचे जिल्हाउपाध्यक्ष संकेत डोके यांनी आयुक्तांकडे पत्र देऊन तक्रार केली आहे.

या परिसरातील रहिवाशी भागातील नागरिकांनी वेळोवेळी पालिकेकडे तक्रारीही केलेल्या आहेत, परंतु या सर्व तक्रारिंना कार्यालयातील कर्तव्य दक्ष अधिकाऱ्यांनी हेतूपुरस्पर केराची टोपली दाखवलेली आहे असा आरोप डोके यांनी केला आहे. त्यामुळे नवी मुंबई परिसरात कायदा सुव्यवस्था नामक गोष्ट शिल्लक न राहिल्याचे चित्र नागरिकांच्या मनांत निर्माण झालेले आहे. या अनधिकृत झोपडपट्टी, व्यवसायिक गाळे व वाहन पार्किंगमुळे परिसरात अवैध धंद्यांनी उन्माद आणला आहे. रात्रीच्या वेळेस उघड्यावर हेणारा देह व्यापार, अनोळखी लोकांचा रहिवाशी परिसरातील वावर, अंमली पदार्थांची सर्रास विक्री, चोरी, मारामाऱ्या या सर्व बाबींचाही समावेश आहे.



या सर्व गोष्टी अतिशय गंभीर असून स्थानिक प्रशासन म्हणून पोलीस, पालिका व सिडको लक्ष देण्याची गरज आहे. स्थानिक नागरिकांच्या भावना या विरोधात तीव्र झाल्या असून त्यांच्या वारंवार याबाबत तक्रारी येत आहेत. तसेच स्थानिक प्रशासनाच्या उदासिनतेमुळे ते स्वतः या विरोधात रस्त्यावर उतरून कारवाई करण्याच्या मानसिकतेत पोहचले आहेत. जर पालिकेने व सिडकोने तातडीने या अनधिकृत झोपडपट्ट्यांवर कारवाई केली नाही तर आंदोलन करू असा इशारा डोके यांडी दिला आहे.

# नेरूळमधील नागरी कामाचा आज शुभारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ-सीवूडस येथे बाळासाहेबांची शिवसेनेच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. त्याअनुषंगाने बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या प्रयत्नाने नेरूळ-सीवूडस येथील महात्मा जोतिबा फुले उद्यानाचे नुतनीकरण तसेच विविध नागरी कामांचा शुभारंभ रविवारी (दि. १) सायंकाळी ६ वाजता उपनेते विजय नाहटा, मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असे निमंत्रक माजी उपमहापौर अशोक गावडे यांनी कळविले आहे.

सीवूडस सेक्टर ४० येथील महात्मा ज्योतिबा फुले उद्यानाचे नव्याने सुशोभीकरण तसेच सीवूडस सेक्टर ४०आणि ४२ मधील एल टी ब्रिज चौक, डी मार्ट चौक, सावळा चौक, सत्यम हॅाटेल चौक आदी ठिकाणी असलेल्या चौकांचे नव्याने सिमेंट कॉंक्रीटीकरण, नेरूळ विभागातील ग्रॅंड सेंट्रल पार्क मॉलपासून सेक्टर २८ येथील बालाजी मंदिरापर्यंतच्या रस्त्याची सुधारणा आदी कामाचा शुभारंभ होणार आहे.

या वेळी जिल्हा प्रमुख विजय चौगुले, संपर्क प्रमुख किशोर पाटकर, महिला जिल्हा संघटक सरोजताई पाटील यासह बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

नवी मुंबईतील गरजू नागरिकांना तत्पर वैद्यकीय मदत मिळावी यासाठी नेरूळ सेक्टर २८ येथील पक्षाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात नूतन वर्षाच्या शुभदिनी सायंकाळी ५ वाजता वैद्यकीय मदत कक्ष सुरू केला जाणार असल्याचे माजी सभापती स्वप्ना गावडे यांनी सांगितले.

# सेंट्रल पार्क ते बेलापूरदरम्यान मेट्रोची यशस्वी चाचणी



**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ वर धावणाऱ्या मेट्रोची चाचणी सेंट्रल पार्क ते बेलापूर या स्थानकांदरम्यान शुक्रवारी (दि. ३०) सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या झाली. मेट्रो मार्ग क्र. १ च्या अंमलबजावणीसाठी अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली आहे.

या वेळी सिडको व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी, महा मेट्रो व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित, सिडकोमुख्य अभियंता (नवी मुंबई) डॉ. के. एम. गोडबोले, सिडको अधीक्षक अभियंता (नैना व मेट्रो) संतोष ओंभासे, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांचे तांत्रिक सल्लागार सुनील गुज्रेलवार, महा मेट्रो कार्यकारी संचालक अनुप अग्रवाल, प्रमुख प्रकल्प व्यवस्थापक रीतेश गर्ग उपस्थित होते. सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने, नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग विकसित करण्यात येत आहेत. मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर हा ११ किमी लांबीचा व ११ स्थानके असणारा मार्ग आहे. या मार्गावरील व्हायडक्टचे काम पूर्ण झाले असून लवकरच सर्व ११ स्थानके प्रवासी वाहतुकीकरिता सुसज्ज होणार आहेत.

सिडकोतर्फे मार्ग क्र. १ वरील उर्वरित कामांची अंमलबजावणी करण्यासाठी महा मेट्रोची अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यापूर्वी पहिल्या टप्प्यात मार्ग क्र. १ वरील सेंट्रल पार्क ते पेंधर स्थानकांदरम्यान मेट्रोची चाचणी यशस्वीरीत्या पार पडली असून या मार्गाकरिता सीएमआरएस यांची मंजुरीही मिळाली आहे. संपूर्ण मार्ग क्र. १ आता लवकरच प्रवासी वाहतुकीकरिता खुला होणार असल्याने नवी मुंबईकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्नही लवकरच पूर्ण होणार आहे, असे एमडी मुखर्जी म्हणाले.

# गव्हाण विद्यालयात गुणवंतांना पारितोषिक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये क्रीडा महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांचा छोटेखानी पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला.

विभागीय क्रीडा स्पर्धेमधील विविध मैदानी व वैयक्तिक खेळामधील विजेत्या स्पर्धकांना हजारो रुपयांची पारितोषिके या वेळी प्रदान करण्यात आली. प्रशस्तीपत्रक, रोख रक्कम आणि पदक असे पारितोषिकांचे स्वरूप होते. विद्यालयाच्या प्रांगणामध्ये इयत्ता अकरावी आणि इयत्ता नववी या दोन वर्गातील विद्यार्थ्यांसमोर हा कार्यक्रम झाला. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या रायगड विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृतज्ञता सप्ताह अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धेमधील मैदानी सांघिक व वैयक्तिक स्पर्धेतील विविध वयोगटातील द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्या स्पर्धकांना ही पारितोषिके आज ( ३१ डिसेंबर २०२२ ) प्रदान करण्यात आली.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या, अन्य शिक्षक व पालक उपस्थित होते. विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांचे समवेत रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, सांस्कृतिक विभाग प्रमुख व लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, प्रा. राजू खेडकर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर व उपशिक्षक सागर रंधवे आदींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. उपशिक्षक प्रसन्न ठाकूर या वेळी उपस्थित होते. उपशिक्षक सागर रंधवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




# माणगाव, तळ्यात विकासाची वाटचाल

## निवी, वावे हवेली येथे कृषी विभागाची भेट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले, कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर व उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांच्यासोबत जिल्ह्यातील १५ तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक यांनी स्वदेस फाउंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आलेल्या माणगाव तालुक्यातील निवी व तळा तालुक्यातील वावे हवेली या स्वप्नातील गावांना नुकतीच भेट दिली.

या भेटीदरम्यान गावातील पायाभूत सुविधा, सामाजिक विकास,आर्थिक विकास व गावाची एकजूट आणि स्वदेस फाउंडेशन यांच्यामार्फत गावात स्थापन केलेल्या विकास समिती व ग्रामस्थ यांनी स्वच्छ, सुंदर, आत्मनिर्भर व सक्षम विकास समिती यांची विकासाकडे वाटचाल दिसून आली. स्वदेस फाउंडेशन व शासन एकत्र येऊन व ग्रामस्थ यांच्या मदतीने विकासाची वाटचाल नक्कीच होईल, अशी अपेक्षा ठेवून गावाची वाटचाल सुरू आहे.

स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार यांनी स्वदेस फाउंडेशनच्या उपक्रमांची माहिती कृषी अधिकाऱ्यांना करून देवून स्वदेस टीमसोबत कृषी अधिकाऱ्यांशी या वेळी विविध विषयांवर चर्चा केली.

गाव विकास समितीने झालेल्या विकास कामांचे सादरीकरण केले, गावाने सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी उद्दिष्टे पूर्ण करीत आरोग्य, शिक्षण, उपजीविका, शेती, कौशल्य विकास व पायाभूत सुविधा यांची स्वदेस फाउंडेशनच्या माध्यमातून स्वप्नातील गाव घडविले आहे. गावामध्ये गावकऱ्यांच्या माध्यमातून झालेल्या विकास कामांची अधिकाऱ्यांनी पाहणी केल्यानंतर ते अधिकारी भारावून गेले.

गाव विकास समिती निवी व वावे हवेली यांनी स्वप्नातील गावची संकल्पना, केलेले नियोजन, गाव विकास आराखडा, त्यानुसार नियोजित वेळेत पूर्ण केलेली कामे यांचे उत्तम पद्धतीने सादरीकरण करण्यात आले. तसेच शेती आणि शेती पूरक व्यवसायातून केलेली प्रगती व पुढे करावयाची कामे आणि जबाबदारी पाहून सर्व अधिकारी वर्गाने गाव विकास समिती चे कौतुक केले. त्याचप्रमाणे जी कामे झाली आहेत, ती सर्व आदर्श कामे रायगड मधील इतर तालुक्यातील गावागावात कशी केली जातील यासाठी सर्वांना प्रोत्साहन दिले.

या वेळी जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी आणि कृषी सहाय्यक तसेच स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार, महाव्यवस्थापक प्रसाद पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक नजीर शिकलगार, विकास खरमाळे, माणगाव तालुका कृषी अधिकारी एन. वाय. घरत, माणगाव व तळा मंडळ कृषी अधिकारी सागर वाडकर, कृषी सहाय्यक मधूकर शेंडे व योगेश कोळी, आत्मा तालुका व्यवस्थापक प्रमोद शिंदे, शिवतेज ढऊल, भीमराव भालेराव, रवींद्र राऊत, प्रदीप चिनके, मिलिंद आढाव, निनाद दर्गे, समन्वयक राकेश पाखुर्डे, लहू दोलताडे, चांगदेव सानप, सरपंच मूठवली तर्फे तळेचे शर्मिला बडेकर, सरपंच ग्रामपंचायत सोनसडे माधुरी पारावे, पोलीस पाटील निवी मानसी बाबरे व गाव विकास समिती निवी व वावे हवेली, शेतकरी बांधव, ग्रामस्थ महिला व पुरुष उपस्थित होते.

# म्हसळ्यातील १३ ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांची उद्या निवड

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात १३ ग्रामपंचायतींच्या उपसरपंचपदाची निवडणुक २ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत होणार आहे.

सार्वत्रिक निवडणुका १८ डिसेंबर २०२२ला झाली असून जिल्हाधिकारी रायगड यानी मंगळवार २७ डिसेंबर २०२२ रोजी आधिसूचनेनुसार पुढीलप्रमाणे सरपंच जाहीर केले आहेत. काळसुरी– राजेंद्र चंद्रकांत घोसाळकर, फळसप – साळवी सुधीर परशुराम, कणघर –सावंत रश्मी संतोष, तोराडी – पवार गुलाब अरविंद, संदेरी –पास्टे शुभांगी विलास, घोणसे –रमेश धोंडू कानसे, लेप–शिगवण स्नेहा संजय, तोंडसुरे –सुरेश भिकू महाडीक, खरसई– कोमल कमळाकर वेटकोळ, देवघर –पोटले सौजन्या सुजित, निगडी– पाखड वेदिका कल्पेश, कांदळवाडा–बने पांडुरंग महादु, रेवली सरपंच राखीव प्रवर्गातील उमेदवार असल्याने सरपंचपद रिक्त आसल्याने मंडळ अधिकारी सलीम शहा यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचाची निवड होणार आहे.

उपसरपंचपदाची निवडणुक मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच निवडणुक नियम१९६४ मधील नियम व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३३मधील तरतुदीनुसार २ जानेवारी २०२३ रोजी स.१०ते २ वाजेपर्यंत होणार आहे.) निवडणुक प्रक्रिया सरपंचाचे अध्यक्षतेखाली होणार आहे.

निवडणुक कार्यक्रम पुढील प्रमाणे असेल. नामनिर्देशनपत्र भरण्याची वेळ सकाळी १० ते १२ व नामनिर्देशनपत्र छाननी दुपारी १ .३० ते १.४५ वाजेपर्यंत होईल. नामनिर्देशनपत्र माघार कालावधी दुपारी १.४५ ते २.४ प्रत्यक्ष निवडणूक दुपारी २ ते कामकाज संपेपर्यंत आहे.

# रोह्यात जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन मार्गदर्शन



(छाया : महादेव सरसंबे)


**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेद्वारे स्वच्छ भारत अभियान व माजी वसुंधरा अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमात माहिती शिक्षण व क्षमता बांधणी घटका अंतर्गत शहरात रोहा अष्टमी नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी डॉ. धीरज किशोर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन मार्गदर्शन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण यांनी जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट गाईडलाईन्स २०१६ नुसार जैवैद्यकीय कचरा कोणत्या प्रकारचा असतो. रंगाच्या डस्टबिननुसार कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्याची योग्य प्रकारे साठवणूक, वहन व व्हिलेवाट कशी करावी याबाबत माहिती दिली. या वेळी जैववैद्यकीय कचरा कसा हाताळावा, कामगारांनी कचरा हाताळताना कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी. जैववैद्यकीय कचऱ्याचे दुष्परिणाम व बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट गाईडलाईन्स २०१६ नुसार नियमांचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाईबाबत मार्गदर्शन केले.

या वेळी रोहा तालुका मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. राजेंद्र धात्रक, डॉ. अशोक जाधव, डॉ. वागळे, डॉ. भट, डॉ. ध्रुव, डॉ. माळी, डॉ. आपणकर, डॉ. म्हात्रे, डॉ. राजू जाधव, डॉ. अंकिता खैरकर, डॉ. राठोड, डॉ. दालमिया, डॉ. आठवले आदी उपस्थित होते.





**गुडबाय २०२२, वेलकम २०२३!**

**मुरूड : सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाचे स्वागत करण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून पर्यटक येथील समुद्रकिनारी दाखल झाले, तर दुसऱ्या छायाचित्रात उंट सफारीचा आनंद घेताना पर्यटक.** (छाया : संजय करडे)

# हिरवळ महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स, आणि हिरवळ रात्र महाविद्यालय महाड यांच्या संयुक्त विद्यमाने १७ डिसेंबर ते २६ डिसेंबर या कालावधीत महाविद्यालयात विविध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमधील खेळाडू वृत्ती जोपासण्यासाठी महाविद्यालयात बॅडमिंटन, चेस, कॅरम, व्हॉलीबॉल, कबड्डी या सारख्या विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच




(छाया : सलीम शेख)

विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना वाव देण्याकरिता महाविद्यालयात कॉलाज, पेंटिंग, फूड, फ्रूट, फ्लॉवर डेकोरेशन, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील नृत्य कला, गायन कला यांना प्रोत्साहन देण्यासाठी तरंग सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तरंग या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर भाई धारिया, जयवंराव देशमुख सरपंच वरंध, पराग प्रभुदेसाई (ए.जी.एम.) मायक्रोस्कॅन, दानिश मुजावर मायक्रोस्कॅन सदस्य, संतोष भाई बुटाला, सेक्रेटरी हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, सुदेश कदम, प्राचार्य कॉलेज ऑफ सीएसआयटी, विद्या गुजर प्राचार्या ज्युनिअर कॉलेज उपस्थित होते.

हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया व हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांच्या प्रोत्साहनाने व महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या विद्या गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# महाडमध्ये वृद्धाची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील जिते गावात एका ८५ वर्षांच्या व्यक्तीने एकटेपणा आणि आजाराला कंटाळून राहत्या घराच्या छताला नायलॉनच्या रस्सीने गळ फास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना २७ डिसेंबर रोजी दुपारी ११:३० ते ३० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. गोविंदराव गेनू ननावरे (वय ८५, रा. जिते, महाड) यांनी आपल्या राहत्या घरी छताच्या भाळाला नायलॉनच्या रस्सीने गळ फास घेऊन आत्महत्या केली. मयत व्यक्तीला तीन मुली आणि एक मुलगा होता. २० वर्षा पूर्वी पत्नीचे निधन झाले असून १५ वर्षांपूर्वी मुलगा मयत झाला होता. सून माहेरी राहत होती तर तीनही मुलींचे लग्न झाल्याने त्या सासरी राहत होत्या.

गोविंद ननावरे हे घरामध्ये एकटेच राहत असल्याने वृद्धपणाला आणि आजाराला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली. महाड अद्योगिक पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार राजेश गोरेगावकर करत आहेत.

# कर्जत तालुका परिसरात अखंड हरिनाम सप्ताह

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या पांचेचाळीस वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या कर्जत तालुका परिसराच्या अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. ३ जानेवारी २०२२पर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात किर्तन प्रवाचनांद्वारे ज्ञानदान होणार असून एक कोटी 'जय जय राम कृष्ण हरी'हा नाम जप करण्याचा संकल्प आहे. दररोज गीता पठण, ज्ञानेश्वरी पारायण, संगीत भजने करण्यात येत आहेत.



(छाया : विजय मांडे)

कर्जतमधील पोलीस ठाण्याच्या माऊली मैदानावर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन कारण्यात आले आहे. प्रवेशद्वार पूजन दत्तात्रेय व वनिता म्हसे, गणेश पूजन अनिल व पुष्पा पाटील, दीप प्रज्वलन हभप नथुराम हरपुडे, वासुदेव इंगळे, शिवाजी भासे, प्रभाकर केळकर, कलश पूजन संभाजी देशमुख, मंडप पूजन बळवंत व बिनीता घुमरे, गीता ग्रंथ पूजन रूपेश भोपतराव, ग्रंथ पूजन पांडुरंग गरवारे, वीणा –टाळ– पखवाज पूजन दीपक लाड, ध्वजारोहण विजय मांडे, व्यासपीठ पूजन तानाजी व सुचिता वांजळे यांच्या हस्ते करण्यात आले. पौराहित्य नरेंद्र जोशी यांनी केले. या वेळी संतोष वैद्य, मिलिंद तिवाटणे, चंद्रकांत म्हसे, हरिभाऊ वाघमारे, सुदाम कारले, तुकाराम बागडे आदी उपस्थित होते.

या ज्ञानेश्वरी व ज्ञानयज्ञ सोहळ्यात ह.भ.प. श्रीराम महाराज पुरोहित, योगी श्री निरंजननाथ गुरु श्री शांतिनाथ यांची प्रवचने होत असून ह.भ.प. मारुती महाराज राणे (कर्जत), ह.भ.प. पांडुरंग महाराज सालुंखे (सांगली), ह.भ.प. योगिराज महाराज गोसावी, ह.भ.प. अशोक महाराज जाधव ( पुणे ),ह. भ. प. आसाराम महाराज बडे (आळंदी), ह. भ. प. चिन्मय महाराज सातारकर, ह.भ.प. भगवती महाराज सातारकर यांची कीर्तन सेवा तसेच समरोपाच्या दिवशी काल्याचे कीर्तन ह.भ.प. चिन्मय महाराज सातारकर यांचे आहे.

समारोपाच्या पूर्व संध्येला दिंडी सोहळा आणि दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ३ जानेवारी २०२३ रोजी ह.भ.प. चिन्मय महाराज सातारकर यांच्या काल्याचे कीर्तन व त्या नंतर महाप्रसादाने सोहळ्याचा समारोप करण्यात येणार आहे.

# डॉ. मदिहा कागदी यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य पथक नांदगाव येथे नव्याने रुजू झालेल्या व उसरोली गावाच्या डॉ. मदिहा कागदी यांनी पदभार स्वीकारताच श्री संत रोहिदास ज्ञाती पंचायत उसरोली चर्मकार समाजातर्फे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कागदी यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी चर्मकार समाज उसरोलीचे समाज अध्यक्ष प्रणय धोडसेकर, सचिव मंगेश नांदगावकर, अनंत नांदगावकर, रमेश पेणकर, सदाशिव पाब्रेकर, चंद्रकांत नांदगावकर, सुरेश मुरुडकर, हेमंत नांदगावकर, अशोक म्हशीलकर, नितेश मुरुडकर, आत्माराम नांदगावकर, मनन नांदगावकर आदी उपस्थित होते.

या वेळी चर्मकार समाज उसरोलीचे समाज अध्यक्ष प्रणय धोडसेकर यांनी सांगितले की, ज्या गावात डॉक्टर लहानच्या मोठ्या झाल्या व गावातील लोकांची सेवा करण्यासाठी त्यांनी येथील पदभार स्वीकारून गावातील लोकांचा ऋणानुबंध जपण्याचा प्रयत्न केला आहे. ही वाखाण्याजोगी बाब असून आम्हाला डॉक्टर यांचा सार्थ अभिमान असून गावातील लोकांसाठी सर्वोत्कृष्ठ सेवा द्यावी अशी विनंती यावेळी त्यांनी केली.

डॉ. मदिहा कागदी यांनी गावातील लोकांना चांगली सुविधा देणार फक्त मला आपला पाठिंबा व आशीर्वाद असावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. दिड वर्षाच्या प्रतीक्षेनंतर या भागाला डॉक्टर उपलब्ध झाल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.



# हुतात्मा गौरव पुरस्कार जाहीर

**कर्जत : प्रतिनिधी**




नेरळ येथील हुतात्मा स्मारक समिती यांच्या माध्यमातून दिले जाणारे हुतात्मा गौरव पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ कवी आणि निवेदक अरुण म्हात्रे आणि सामाजिक क्षेत्रात काम करणारी नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांना देण्यात येणार आहे. दोन जानेवारी रोजी हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या सिद्धगड बलिदान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हुतात्मा गौरव पुरस्काराचे वितरण केले जाते.

रायगड प्रेस क्लब आणि कर्जत प्रेस क्लब यांचा उपक्रम असलेल्या हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने नेरळ येथील हुतात्मा चौकात हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा स्मृतिदिन सिद्धगड बलिदान म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी अभिवादन सभा आयोजित केली जाते. हुतात्मा चौक येथे २ जानेवारी रोजी सायंकाळी होणाऱ्या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या दोन व्यक्ती किंवा संस्था यांचा सन्मान हुतात्मा गौरव पुरस्कार देवून केला जातो.

या वर्षी आघाडीचे कवी आणि निवेदक संपादक अरुण म्हात्रे आणि कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात सामजिक काम करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांचा सन्मान होणार आहे. श्री साया ट्रस्टकडून अध्यद गणेश अय्यर आणि संचालिका राधिका घुले या पुरस्कार स्वीकारणार आहेत. या दोन्ही पुरस्कारांची घोषणा हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने करण्यात आली आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल,श्रीफळ आणि झाडाचे रोप असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दोन जानेवारी रोजी हुतात्मा चौकात आयोजित होणाऱ्या सिद्धगड बलिदान दिनाच्या कार्यक्रमात कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार असून कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड, नेरळ ग्रामपंचायत सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर, नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात हुतात्मा गौरव पुरस्काराचे वितरण होणार असून सुरुवातीला नेरळ मधील हाजी लियाकत इंग्लिश मिडीयम स्कूल चे विद्यार्थी सिध्दगड बलिदानाचा रणसंग्राम हे नाटक सादर करणार आहेत.

# बीसीसीआयची आज मुंबईत आढावा बैठक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे १ जानेवारी २०२३ राशेजी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) आढावा बैठक होणार आहे. या बैठकीत मागील विश्वचषकाचा अहवाल सादर केला जाईल आणि पराभवाची कारणे पाहिली जातील. बैठकीला बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी, टीम इंडियाचे प्रशिक्षक राहुल द्रविड, एनसीए प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण आणि कर्णधार रोहित शर्माही उपस्थित राहणार आहेत.

२०२२ हे वर्ष टीम इंडियासाठी चांगले नव्हते, जिथे संघ प्रबळ दावेदार असलेल्या आशिया कपच्या अंतिम फेरीतही पोहचू शकला नाही. टी-२० विश्वचषकात खराब कामगिरी तसेच दुखापतींच्या समस्या कायम होत्या. या पार्श्वभूमीवर पुढील नियोजन काय असेल, टीम इंडिया कशी पुढे जाईल आणि आगामी विश्वचषकाची तयारी कशी सुरू करावी याबाबत बीसीसीआयच्या बैठकीत विचारमंथन होण्याची चिन्हे आहेत.

टीम इंडिया या टी-२० मालिकेनंतर तीन वनडे खेळणार आहे, जी मिशन वनडे वर्ल्डकपच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे.





## आशिष गौतमला खो-खोची शिष्यवृत्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

फलटण येथे झालेल्या किशोर-किशोर राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील गुणी आणि होतकरू खेळाडूंसाठी खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाने शिष्यवृत्ती देण्यात येईल असे स्पर्धेदरम्यान जाहीर केले होते. त्यानुसार ऐरोलीचा खेळाडू आशिष गौतम याला शिष्यवृत्ती मिळणार आहे.


प्रत्यक्ष मैदानातील कामगिरीच्या आधारे सुवर्णपदक विजेत्या महाराष्ट्राच्या किशोर संघातील सहा खेळाडूंना शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. यात महाराष्ट्राच्या संघात ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऐरोलीच्या विहंग क्रीडा मंडळाचा खेळाडू आशिष गौतम याचाही समावेश आहे. या शिष्यवृत्तीमुळे अशिषला काहीसे आर्थिक पाठबळ मिळणार आहे.






















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com